पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला
● वर्ष १६ ● अंक ८७ ● शनिवार, दि ३ ऑक्टोबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८
RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

चांगल्या व्यक्तीशी
नाते ठेवणे
म्हणजे सुगंधी फुलांच्या
सान्निध्यात राहण्यासारखे आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट
बाळापुर शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिराती साठी
संपर्क
रविंद्र वखरे
शहर प्रतिनिधी
+91 7798750195

# सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी - चंद्रशेखर बावनकुळे

## मदतीचे निकष ठरविण्यासाठी पंचनाम्यांची गरज
## कर्जवसुलीची सक्ती करु नका - सरकारचे स्पष्ट आदेश

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**अकोला :** राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केवळ सरकारी अहवालांवर विसंबून न राहता थेट मैदानात उतरून शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा मार्ग निवडला आहे. दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या बळीराजाला दिलासा देण्यासाठी त्यांनी सुरू केलेला संवेदनशील दौरा सध्या राज्यभरात मोठ्या आशेचा आणि आश्वासनाचा किरण ठरत आहे. यावेळी पालकमंत्री आकाश फुंडकर, खा. अनुप धोत्रे, आ.रणधीर सावरकर, आ. वसंत खंडेलवाल, आ.हरिश पिंपळे, आ.प्रकाश भारसाकळे, महापौर,स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल आदींची उपस्थिती होती.

आज सकाळी सर्किट हाऊस परिसरा महसुल मंत्री येणार म्हणून साधा मंडप उभारून शेतकऱ्यांच्या भेटीगाठी घेतल्या. प्रशासकीय दप्तर दिरंगाईला बगल देत त्यांनी स्वतः शेतकऱ्यांचे एकेक निवेदन स्वीकारले. यावेळी तब्बल दीडशेहून अधिक निवेदनांची त्यांनी जागेवरच बारकाईने छाननी केली. प्रत्येक निवेदनाची प्रत स्वतः वाचून, त्यावर संबंधित विभागांनी नेमकी काय उपाययोजना करावी, याचे स्पष्ट व थेट निर्देश स्वतःच्या हाताने शेरे लिहून दिले. प्रश्नांची उकल कागदावर नव्हे तर प्रत्यक्षात व्हावी, यासाठीचे हे भक्कम ग्राउंडवर्क शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारे ठरले.केवळ सरकारी यंत्रणेवर जबाबदारी ढकलून न देता, बावनकुळे यांनी थेट 'लोकसंवाद' साधण्यावर भर दिला आहे. दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांच्या भावना समजून घेत त्यांच्याशी जिव्हाळ्याचे नाते जोडणारा एक आश्वासक चेहरा म्हणून ते समोर आले आहेत. विभागांनुसार वेगवेगळ्या असलेल्या समस्या तात्काळ निकाली काढण्यासाठी त्यांची तत्परता वाखाणण्याजोगी आहे. दुष्काळाची तीव्रता जिथे जिथे पोहोचली आहे, तिथपर्यंत पोहोचण्यासाठी ते रोज शेकडो किलोमीटरचा प्रवास करत असून दररोज हजारो नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेत आहेत.



### 'स' सरकारचा 'स'-सप्तपदी'चा !

या संपूर्ण दौऱ्याचे वैशिष्ट्य म्हणजे महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सरकारी कामात त्यांनी आणलेली 'स-सप्तपदी'!. दूष्काळी परिस्थितीत होरपळणाऱ्या शेतकऱ्यांच्या आयुष्यात दिलासा आणण्यासाठी महसुल मंत्र्यांनी संवाद, सांत्वन, संपर्क, समन्वय, सहानुभूती, सक्षमीकरण आणि सक्रियता या सात सूत्रांचा प्रभावीपणे वापर केला. विविध सरकारी विभागांशी तात्काळ ताळमेळ साधत 'समन्वय' निर्माण करणे, शेतकऱ्यांच्या व्यथांसोबत 'सहानुभूती' जपणे, समस्यांवर थेट उपाय शोधून बळीराजाचे 'सक्षमीकरण' करणे आणि स्वतः फिल्डवर धावपळ करून 'सक्रियता' दाखवणे, यांमुळे या दौऱ्याला मोठे यश मिळत आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसून त्यांना पुन्हा उभे राहण्याचे बळ देणारा हा संवेदनशील दौरा, राज्य सरकारच्या तत्पर आणि लोकभिमुख कारभाराची साक्ष देत आहे.

### शेतकऱ्यांनी टोकाचे पाऊल उचलू नये

जिल्ह्यात दुष्काळजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या तीव्र संकटकाळात शेतकरी आत्महत्यांच्या वाढत्या घटनांवर राज्य सरकारने अत्यंत गंभीर भूमिका घेतली आहे. संकट कितीही मोठे असले तरी शेतकऱ्यांनी टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन महसुल मंत्री बावनकुळे यांनी करत शासनाने सर्व बँका आणि खासगी सावकरांना शेतकऱ्यांना वेठीस न धरण्याचे सक्त निर्देश दिले आहेत. जिल्ह्यातील पतसंस्थांपासून ते राष्ट्रीयकृत बँका, खासगी व डीसीसी बँकांपर्यंत कोणीही शेतकऱ्यांना फोन करून मानसिक त्रास देऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच अवैध सावकरांवर कठोर कारवाईचा बडगा उगारतानाच वैध साहूकारांनाही शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची सूचना दिली आहे. ॲग्रीस्टॅक किंवा वारसनोंदी अद्ययावत नसल्यामुळे कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या १० ते २० हजार शेतकऱ्यांच्या कागदपत्रांची पूर्तता आणि केवायसी तात्काळ पूर्ण केली जाईल, असे महसुल मंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. गावागावात तलाठी आणि कृषी सहाय्यकांच्या माध्यमातून मदतीची प्रक्रिया राबवली जात असून, या नैसर्गिक संकटात सरकार बळीराजाला संपूर्ण ताकद सरकार देणार. मंगळवारी कॅबिनेट बैठक होत आहे. दिवाळी पुर्वी काही मदत करण्याविषयी विचार सरकार करत आहे. केंद्राचे निकष पुर्ण करण्यासाठी विविध पाहण्या सुरु आहेत. त्या पाहण्यापुर्ण झाल्यावर सरकार योग्य ती घोषणा करेल, असे महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.

## »थोडक्यात

### पंतप्रधान नरेंद्र मोदी बारामतीत येणार!

बारामती : राज्याचे ज्येष्ठ नेते शरद पवार राज्यातील दुष्काळी दौऱ्यावर आहेत. आज दौऱ्याचा दुसरा दिवस असून बारामती आणि दौंड येथील शेतकऱ्यांना ते भेटणार आहेत. दरम्यान, आज त्यांनी पत्रकार परिषद घेऊन महत्त्वाची माहिती दिली. ३ नोव्हेंबर रोजी बारामती येथील विद्या प्रतिष्ठान येथे एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आले असून खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी या कार्यक्रमाला येणार आहेत. शरद पवार अध्यक्ष असलेल्या विद्या प्रतिष्ठानमध्ये ९ फुटी आणि ४ टन वजनाचा गौतम बुद्धांचा पुतळा नक्षत्र गार्डनमध्ये उभारण्यात येणार आहे.

---

### रामजन्मभूमी परिसरात गॅस पाइपलाईन फुटली!

अयोध्या : येथील रामजन्मभूमी परिसरात शुक्रवारी दुपारी अचानक सुरू झालेल्या गॅस गळतीने परिसरात एकच घबराट पसरली. खबरदारीचा उपाय आणि भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रामललासह परिसरातील सर्व मंदिरांमधील दर्शन जवळपास पाऊण तास थांबवण्यात आले होते. राम मंदिराच्या उत्तर-पश्चिम दिशेला असलेल्या संरक्षक भिंतीबाहेरून जाणारी पीएनजी गॅसची पाइपलाईन फुटल्याने हा संपूर्ण प्रकार घडला.

---

### पुण्यात एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनात फूट!

पुणे : विविध मागण्यांसाठी रस्त्यावर उतरलेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला वेगळे वळण लागले आहे. विद्यार्थ्यांच्या या एकजुटीत आता फूट पडल्याचे चित्र असून, एकाच वेळी शहरात दोन गटांकडून आंदोलन सुरू करण्यात आले आहे. लाल बहादूर शास्त्री रस्त्यावरील अहिल्या अभ्यासिकेसमोर एक गट, तर एस. एम. जोशी पुलावर दुसरा गट आंदोलन करत आहे. शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांशी चर्चा केल्यानंतर घेतलेल्या निर्णयावरून या दोन्ही गटांत मतभेद निर्माण झाले आहेत.

**CLASSIFIED**
**पाहिजेत**
Myntra कंपनी करिता
डिलिव्हरी बॉय पाहिजेत
■ साई नगर रूट
■ तपवन रूट
■ गोपल नगर
आमचा पत्ता
मोती बाग जवड मोती नगर
अमरावती 444606
संपर्क 8626048727



# टीम इंडियाची 'सुवर्ण' मोहर!

## फायनलमध्ये पाकिस्तान चारी मुंड्या चित

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**मुंबई :** आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ च्या क्रिकेट फायनलमध्ये भारतीय संघाने कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा पराभव करत सुवर्णपदकावर नाव कोरले आहे. जपानमधील कोरोगा स्पोर्ट्स पार्कवर खेळल्या गेलेल्या या हाय-व्होल्टेज सामन्यात, भारताने पाकिस्तानवर १९ धावांनी विजय मिळवला आहे. या सामन्यामध्ये भारताने पहिल्यांदा फलंदाजी करताना २० ओव्हरमध्ये २११-६ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानला भारताच्या गोलंदाजांनी २० ओव्हरमध्ये १९२-६ धावांवरच रोखले. आशियाई क्रीडा स्पर्धेतील आपले वर्चस्व कायम राखले असून सलग दुसरे सुवर्णपदक नावावर केले आहे. टॉस जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या भारताने २० ओव्हरमध्ये ६ बाद २११ धावा केल्या होत्या. सलामीवीर अभिषेक शर्माने २८ चेंडूंत ६१ धावा आणि उपकर्णधार तिलक वर्माने २१ चेंडूंत ५१ धावा झंझावाती अर्धशतके ठोकून पाकिस्तानच्या गोलंदाजीची पिसे काढली होतीत. मधल्या फळीत श्रेयस अय्यर २१ धावा आणि ईशान किशनने २० धावा करत डाव सावरला, तर शिवम दुबे २७ धावा करताना उपयुक्त योगदान दिले. पाकिस्तानकडून अराफत मिन्हासने सर्वाधिक २ बळी घेतले.

### श्रेयसच्या टीम इंडियानंही जिंकलं 'गोल्ड'

२०१० पासून आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुष क्रिकेटचा समावेश करण्यात आला आहे. भारताने मागील स्पर्धेपासून या क्रीडा प्रकारात सहभाग नोंदवला आणि पदार्पणातच ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली सुवर्णपदक पटकावले. त्यानंतर आता श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने सुवर्णपदकाचा यशस्वी बचाव करत इतिहास रचला. टीम इंडियाच्या या खास कामगिरीनंतर भारताच्या खात्यात यंदाच्या स्पर्धेतील १९ सुवर्णपदकांची नोंद झाली आहे. याआधी हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारताच्या रनरागिणींनीही महिला क्रिकेटमध्ये सुवर्ण कामगिरी करून दाखवली होती.

# आगामी काळात देशात राजकीय भूकंप होणार : खा. संजय राऊत

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

मुंबई : १७ सप्टेंबरनंतर देशातील राजकीय वातावरण झपाट्याने बदलत असून, नरेंद्र मोदी हे जास्त काळ पंतप्रधानपदावर राहणार नाहीत. तसेच, आगामी नोव्हेंबर ते जानेवारी दरम्यान देशात मोठी राजकीय उलथापालथ आणि भूकंप पाहायला मिळेल,' असा खळबळजनक दावा शिवसेना (उबाठा) पक्षाचे खा. संजय राऊत यांनी केला आहे. आज मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी देशाच्या राजकारणासह आगामी ठाकरे बंधूंच्या संयुक्त



मोर्चाबाबत सविस्तर माहिती दिली. संजय राऊत यांनी माहिती देताना सांगितले की, निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, या प्रमुख मागणीसाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या मार्गात आता बदल करण्यात आला असून, हा मोर्चा 'मेट्रो सिनेमा' येथून सुरू होऊन थेट 'बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयावर' धडकणार आहे. या मोर्चाला राज्यातील प्रमुख राजकीय पक्षांनी मोठी ताकद दिली असल्याचे राऊत यांनी स्पष्ट केले. शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, डावे पक्ष, शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या सर्व प्रमुख पक्षांसह महाविकास आघाडीने या मोर्चाला आपला पूर्ण पाठिंबा जाहीर केला आहे.

### देशात लोक एकटे लढताहेत - राहुल गांधी

**नवी दिल्ली :** देशभरात अन्यायाविरुद्ध आणि आपल्या हक्कांसाठी लढणाऱ्या लोकांचा आवाज एकत्र जोडण्यासाठी राहुल गांधी यांनी 'सत्याग्रह' नावाचा उपक्रम सुरू केला आहे. जे लोक अन्यायाविरुद्ध लढत आहेत, त्यांनी आपली कहाणी पाठवावी. मी विरोधी पक्षनेता म्हणून संसदेतून रस्त्यापर्यंत तुमच्यासोबत उभा आहे, असेही राहुल गांधी यावेळी म्हटले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी आणि मतदार यादीच्या एसआयआरच्या विरोधात विरोधी पक्ष, कॉकरोच जनता पार्टी आणि डाव्या विचारसरणीच्या विद्यार्थी संघटना आंदोलन करत आहेत.

# हिंगोलीत भूकंप, उमरखेडपर्यंत हादरे

## ४.५ रिश्टरचा भूकंप; नागरिकांमध्ये भितीचे वातावरण

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**यवतमाळ :** हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यात पांगरा शिंदे परिसरात शनिवारी सकाळी ९ वाजून ४३ मिनिटांनी ४.५ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली. या भूकंपाचे सौम्य हादरे यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड शहरासह तालुक्यातील काही भागांतही जाणवल्याने नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या नोंदीनुसार भूकंपाचा केंद्रबिंदू १९.५५५ उत्तर अक्षांश आणि ७७.२२९ पूर्व रेखांशावर असून, भूकंपाची खोली सुमारे पाच किलोमीटर होती. केंद्रबिंदू उमरखेडपासून सुमारे ४९ किलोमीटर अंतरावर असल्याने उमरखेड परिसरातही त्याचे हादरे जाणवले. सकाळची वेळ असल्याने अनेक नागरिक घरांमध्ये असतानाच अचानक खिडक्या दरवाजे तसेच घरातील वस्तू हलल्याचा अनुभव आला. काही नागरिकांनी तत्काळ घराबाहेर येत एकमेकांकडे भूकंपाबाबत विचारणा केली. काही काळ परिसरात संभ्रमाचे वातावरण होते. दरम्यान, हिंगोली जिल्हा प्रशासनाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिलेल्या माहितीनुसार, भूकंपामुळे हिंगोली जिल्ह्यातही कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झालेली नाही. जिल्हा प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. उमरखेड शहर व तालुक्यातदेखील भूकंपामुळे कोणतीही जीवितहानी किंवा मोठ्या नुकसानीची माहिती तत्काळ समोर आलेली नाही. मात्र, जवळच्या हिंगोली जिल्ह्यात झालेल्या या भूकंपाच्या धक्क्यामुळे उमरखेडकरांचेही लक्ष वेधले गेले.

# अमरावतीच्या कन्येची सुवर्ण भरारी!

## आशियाई स्पर्धा २०२६ : आर्चरी प्रकारात दोन सुवर्ण

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

अमरावती : अमरावतीची कन्या असलेल्या कुमकुम मोहोड हिने बांबूच्या कामठ्यांपासून बनवलेल्या साध्या धनुष्यावरून सराव करीत आपल्या ध्येयाकडे प्रवास सुरू केला. आज हा प्रवास आशियाई क्रीड स्पर्धेत दोन सुवर्णपदकांपर्यंत पोहोचला आहे.

आशियाई स्पर्धा २०२६ मध्ये भारताच्या १७ वर्षीय युवा महिला आर्चरी खेळाडू कुमकुम अनिल मोहोडने सुवर्ण इतिहास रचला आहे. महिला रिकर्व्ह प्रकारात सुवर्णपदक पटकावणारी कुमकुम ही भारताची आजवरची पहिली महिला खेळाडू ठरली आहे. सुवर्णपदकासाठी अटीतटीच्या झालेल्या सामन्यात कुमकुमने दक्षिण कोरियाच्या दिग्गज खेळाडूला पराभूत केले. या विजयासह तिने ४८ वर्षांचा सुवर्णपदकाचा दुष्काळ संपवला. तसेच कुमकुमने २०२८ मध्ये होणाऱ्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिक स्पर्धेचे आपले तिकीट पक्के केले आहे. विशेष म्हणजे कुमकुम मोहोड आणि दक्षिण कोरियाची ओह येजिन यांच्यात पाच सेटपर्यंत चाललेला हा सामना धडकी भरवणारा होता. कुमकुम ही जिल्हा क्रीडा संकुल येथील खेलो इंडियामध्ये नियमित सराव करणारी खेळाडू असून, तिला प्रशिक्षक प्रफुल्ल डांगे यांचे मार्गदर्शन लाभले.



### आजीच्या पैशांनी साधा धनुष्य खरेदी

दरम्यान, कुमकुमने तिच्या आजीच्या पैशांनी खरेदी केलेल्या एका साध्या धनुष्याने तिरंदाजीला सुरुवात केली. अमरावतीमधील एका सामान्य कुटुंबातून आलेल्या कुमकुमसाठी प्रशिक्षणासाठी ये-जा करणं आव्हानात्मक होतं, त्यामुळे वाहतुकीचा खर्च वाचवण्यासाठी तिचे वडील तिला अनेकदा त्यांच्या मोटरसायकलवरून अकादमीत घेऊन जात असत. अनेक वर्षे, तिने मर्यादित संसाधनं आणि जुन्या उपकरणांसह प्रशिक्षण घेतलं आणि स्पर्धांमध्ये भाग घेतला.

“ कुमकुम मोहोड ही अतिशय जिद्दी अन् मेहनती खेळाडू असून तिने प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत सुवर्ण यश मिळवित इतिहास रचला ही अमरावतीसाठी अभिमानाची बाब आहे.२०२८ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेतही ती भारताला सुवर्ण पदक प्राप्त करून देणार, असा विश्वास आम्हाला आहे. त्यासाठी तिला आवश्यक त्या क्रीडा सुविधा पुरविण्यास आम्ही कटिबद्ध असून, तिला कॅश प्राइज मिळावे, यासाठी राज्य शासनाकडे तत्काळ प्रस्ताव पाठविण्यात येईल.

**-गणेश जाधव,** जिल्हा क्रीडा अधिकारी, अमरावती





# खदखदणारा असंतोष!



पुरुषोत्तम काळबांडे
नागपूर
संवाद:- 9403341432

मनुष्य हा जन्मताच स्वतंत्र आहे. आणि त्याला आपल्या समस्या मांडण्याचा आणि त्यावर आवाज उठवण्याचा पूर्ण अधिकार आहे. असे जरी असले तरी त्याला एक चाकोरी बद्ध करण्यासाठी संविधानाची आवश्यकता असते . आणि हीच गरज लक्षात घेऊन भारत देशाने नोव्हेंबर १९४९ ला राज्यघटनेचा स्वीकार केलेला आहे. उद्देश हाच की देशाची राज्यव्यवस्था सूचारूपणे आणि एका विशिष्ठ चाकोरी मधे चालावी. जेणे करून समानता व सर्वांना न्याय मिळेल. स्वातंत्र्योत्तर काळात स्थापित झालेल्या सरकारने संविधानानुसार देशाला प्रगतीच्या वाटेवर घेऊन जाण्याचा परिपूर्ण प्रयत्न केला. सर्व देशबांधवांना एकोप्याने संघटित ठेवण्याचा प्रयत्न सुद्धा केला. भारत देशाने विविध पक्ष्यांचे वेळोवेळी आलेल्या सरकारच्या माध्यमातून आपल्या देशाला प्रगतीच्या वाटेवर घेऊन जाण्याचा प्रयत्न केला आणि आजही करत आहेत. परंतु त्याची दिशा आणि दशा मंदावली आहे. राजकारण हे जातीवर आधारित झालेले आहे. सत्तेत येण्यासाठी प्रत्येक राजकीय पक्षाने जाती आधारित राजकारण केलेलं आहे जाती जाती, धर्मा धर्मा मध्ये दरी निर्माण झालेली दिसत आहे आणि याचा परिणाम लोकांमध्ये मनभेद निर्माण झाला असे दिसते. समाजामध्ये वैचारिक मतभेद असेल तर यामधून राष्ट्रविकासाचा मार्ग काढता येईल परंतु माणसा-माणसा मधील मनभेद राष्ट्राला अधोगतीकडे घेऊन जाण्यास कारणीभूत ठरू शकते. जातीय राजकारणाच कोणत्याच राजकीय पक्षाला वावग नाही. मग ती काँग्रेस पार्टी असो की भाजप पार्टी असो.आणि बाकी छोटेमोठे पक्ष हेच करत आहे. अशाप्रकारच्या राजकारणाने 'सर्व धर्म समभाव' या संकल्पनेला तडा गेलेला आहे. समानता तर दूर, न्याय सुद्धा मिळणे कठीण होत आहे. जातिभेद,भेदाभेद यामुळे लोकशाही ही प्रशासन व्यवस्था आपल्या देशाने स्वीकारलेली आहे. तिला तडा गेलेला दिसतो आहे. आणि ह्या सर्वाचा परिणाम म्हणजे देशात लोकतंत्र आहे की ठोकतंत्र आहे यातील फरक करणे कठीण झाले आहे. सहमतीच आणि तडजोडीचे राजकारण जाऊन तोडफोडीच आणि द्वेषाचं राजकारण सुरू झालेलं आहे. परंतु यामुळे आणि यामध्ये सामान्य नागरिक, कामकरी, शेतकरी, विद्यार्थी भरडल्या जात आहे. प्रत्येक जण हक्कासाठी, न्यायासाठी , समानतेसाठी आवाज उठवत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये याचे प्रमाण वाढलेले आहे. अलीकडच्या वर्षात देशात असंतोष वाढत आहे. आणि राजकीय उलाढाली अश्याच सुरू राहिल्या तर त्यामध्ये वाढ सुध्दा होऊ शकते. याची कारणमीमांसा होणे गरजेचे आहे. पाणी कुठं मुरतंय की, देशवासीयांच्या मनात असंतोष खदखदत आहे? काही वर्षांपूर्वी देशाचा शेतकरी आपल्या हक्कासाठी व मागण्या मान्य करून घेण्यासाठी दिल्ली, हरियाणा व पंजाब राज्याच्या सीमेवर ठिय्या देऊन बसले होते. सतत १३ ते १४ महिने त्यांचा संघर्ष चालू राहला. या त्यांच्या हक्काच्या लढाईमध्ये ७५० ते ८०० शेतकऱ्यांना आपल्या प्राणास मुकावे लागले. त्यांना न्याय मिळाला का ? त्यानंतर हरियाणा कुस्तीपटू ह्यांनी न्यायासाठी आंदोलन केले ठिय्या दिला. त्यांना न्याय मिळाला का ? सरकारच्याच घिसाडघाईमुळे महाराष्ट्रात "मराठा आरक्षण आंदोलन" बळकट होऊन एका विशिष्ठ अंतराने आवाज उठवतात. आणि सरकार आंदोलकांना फक्त आश्वासने देऊन गप्प करण्याचा प्रयत्न करतात. परत, पुन्हा ' येरे माझ्या मागल्या.' गेल्या एक दोन वर्षात अनेक समस्यांना घेऊन आंदोलक रस्त्यांवर येत आहेत. उदा. शेतकरी आंदोलन, कर्मचारी आंदोलन, विद्यार्थी आंदोलन त्यांच्या विविध प्रकारच्या मागण्यांना घेऊन रस्त्यांवर ठिय्या देतात. गेल्या जून- जुलै महिन्यात अचानकच विद्यार्थ्यांचं नवीन आंदोलन सुरू झालं. विद्यार्थ्यांप्रती सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी केलेले बेजबाबदार वक्तव्य (Cockroaches) यामुळे असंतोषाला खतपाणी मिळाले आणि त्यातून एक भक्कम नवीन आंदोलन उदयास आले. गंमत जंमत म्हणून Cockroach Janata Party उदयास आली. वारंवार NEET UG परीक्षेचा पेपर फुटी आणि यावरून संपूर्ण देशामध्ये विद्यार्थ्यांनी रणकंदन केले. दिल्ली येथील जंतर मंतर मैदानावर जवळजवळ महिनाभर देशभरातील विद्यार्थ्यांनी ठिय्या दिला. आंदोलनाला काही समाजकंटकांनी हिंसक वळण देण्याचा प्रयत्न सुद्धा केला. परंतु GEN Z ने शांततेत आंदोलनाला पुढे नेले आणि अक्षरशा सरकारच्या नाकात दम भरला. सरते शेवटी सरकारला नमतं घ्यावं लागलं. देशाचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा देण्यास भाग पाडलं. आपण विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये संप करतांना किंवा फर्निचर तोडतांना ऐकतो. एका विद्यापीठात काही अडचणी निर्माण होतात आणि नंतर इतर विद्यापीठांमध्ये बातमी पसरते. त्याला हिंसक वळण लागू शकते. परिणामी, सरकारसाठी हे व्यवस्थापित करणे आव्हानात्मक बनते. विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रभावित होते आणि विद्यापीठ राजकारणाचे केंद्र बनते. विद्यार्थ्यांमध्ये विरोध करण्याची वृत्ती विकसित होते. यामुळे संपूर्ण राष्ट्राला त्रास होऊ शकतो. विद्यार्थ्यांचा असंतोष फक्त भारतापुरता मर्यादित नाही. जगातील अनेक देशांमध्ये विद्यार्थी आंदोलने झालेली आहेत आणि सरकारे सुध्दा उलथून टाकली आहेत उदा. आपला शेजारी देश नेपाळ. म्हणूनच सामान्यपणे असे मानले जाते की आपण शोधू शकल्यापेक्षा काही गंभीर कारण असावे. काहींनी सुचवले आहे की शिक्षण जीवनातील बदलत्या परिस्थितींशी जुळत नाही. शिक्षणानुसार नोकऱ्या उपलब्ध नाही. शिक्षणाच्या झालेल्या प्रसारानुसार संबंधित नोकऱ्या निर्माण होत नाहीत. शिक्षणाचा बाजार झाला परंतु त्यातुलनेने सरकार रोजगार निर्माण करत नाही. या व्यतिरिक्त अशी अनेक क्षेत्रे आहेत त्यामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध नाही. ही खऱ्या अर्थाने सरकारची जबाबदारी आहे. शिक्षण क्षेत्रातील विविध शाखांमधून यशस्वी होऊन निघणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणात नोकऱ्या व रोजगार उपलब्ध होत नाही. खऱ्या अर्थाने 'हाताला काम' देण्यास सरकार पूर्णपणे अपयशी ठरत आलेले आहे आणि होत आहे. देशात निर्माण होत असलेल्या असंतोषाचे एकमेव कारण जर कोणते असेल तर ते नवीन पिढी व लोकांच्या हाताला काम नसने, असे मला वाटते. तसेच विद्यार्थ्यांमध्ये धुमसत असलेल्या असंतोषाची अनेक कारणे असू शकतात. जसे, आणखी एक मानसशास्त्रीय कारण म्हणजे तरुण लोक लोकशाहीवादी झालेले आहेत पण शिक्षण अजूनही अधिनायकवादी (स्वास्थानिकांच्या पथ्यावर पडणारा) आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना विद्यापीठांमध्ये प्रचलित अधिनायकवाद आवडत नाही. शिवाय, विद्यार्थ्यांना स्वतःच्या समस्याही असतात ज्या शिक्षक आणि प्राध्यापक पूर्णपणे दुर्लक्षित करतात. उदा. IIT मुंबई येथील विद्यार्थ्याने फाशी घेऊन आत्महत्या केली, कारण अजूनपर्यंत स्पष्ट नाही. विद्यापीठे आता राजकारणाचे मैदान बनली आहेत. विद्यापीठांमध्ये सुद्धा जाती भेद हा प्रकार अधूनमधून आपल्याला दिसून येतो. त्याच कारणास्तव महाविद्यालयांमधून व विद्यापीठांमधून वरील घटना घडतांना दिसतात. उपकुलपतीची नियुक्ती विशिष्ट राजकीय पक्षांना फायदा व्हावा म्हणून केली जाते. परीक्षा पारदर्शक होत नाही. परिणाम पुनर्परीक्षा. वारंवार होणाऱ्या परीक्षांमुळे विद्यार्थी आर्थिक तसेच मानसिकदृष्ट्या खचलेला दिसतो. त्याचाच उद्रेक आंदोलने व असंतोष. तसंच, विद्यार्थी परिषदांच्या निवडणुकांनी महाविद्यालय आणि विद्यापीठांमध्ये राजकारण आणलं आहे. परिणामी, निरागस विद्यार्थी सहसा राजकारण्यांनी शोषले जातात. फक्त काही मर्यादित विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास परवानगी देऊन विद्यार्थ्यांचा असंतोष मिटवता येणार नाही. तसेच, हा एक नकारात्मक दृष्टिकोन आहे. विद्यापीठांना राजकारण्यांचे खेळाचे मैदान होऊ द्यायचे नाही. अर्थातच आज शाळा, महाविद्यालये राजकारण्यांचे खेळाचे मैदानचं झालेले आहे. जर हे केले नाही, तर विद्यार्थ्यांमधील अस्वस्थता संपूर्ण देशात पसरू शकते आणि याची सुरुवात झालेली दिसत आहे. शाळा आणि महाविद्यालयांमधून होणारे शोषण व अत्याचार यासाठी Gen Alpha ही पिढी रस्त्यावर उतरली असून तीने याविरोधात आवाज उठवण्यास सुरुवात केलेली आहे. "जिकडे-तिकडे अस्वस्थता चोहीकडे", असे दृष्य संपूर्ण देशात दिसत आहे. ही अस्वस्थता राष्ट्राला हानी पोहोचवू शकते. सरकारने याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ही विद्यार्थ्यांमधील अस्वस्थता म्हणजे भविष्याची पिढी नैराश्यवादी आणि कमकुवत करणे होईल आणि देश खालच्या स्तरावर जाईल. तरुण पिढी ही देशाचे (कोणत्याही) आधारस्तंभ असतात असे म्हटल्या जाते. ती देशाचं भविष्य आहे.

# निजामशाही उखडणाऱ्या 'फकिरा'ची कथा!



स्वामी रामानंद तीर्थ यांची ओळख मराठवाड्याचे मुक्तिदाते अशी आहे. पण ते केवळ मराठवाड्याचेच नव्हे तर ते पूर्ण हैदराबाद संस्थानचे मुक्तिदाते होते. त्यांनी हैदराबाद संस्थान केवळ निजामाच्या जाचातून मुक्तच केलं नाही तर नव्या राज्याची दिशा कशी असावी, हे देखील त्यांनी दाखवून दिलं होतं. त्यांनी अनेक नेते घडवले. गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, आ. कृ. वाघमारे, अनंत भालेराव, दिगंबरराव बिंदू या नेत्यांचं नेतृत्व त्यांनी केलं होतं. इतकंच नव्हे तर भारताचे माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव हे देखील त्यांचेच शिष्य होते. नरहर कुरुंदकरांना देखील त्यांनीच पीपल्स कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नियुक्त केलं होतं.स्वामीजी हे उत्तम नेते होते यात शंकाच नाही पण त्याच बरोबर त्यांनी नवं नेतृत्व समोर यावं म्हणून देखील काम केलं. १५ ऑगस्ट १९४७ ला जेव्हा भारत स्वतंत्र झाला त्याच दिवशी त्यांना अटक झाली होती. पूर्ण देश स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करत होता. पण भारताचा अंदाजे सव्वा दोन लाख स्क्वेअर किमी भाग अद्याप पारतंत्र्यात होता. इतकंच नाही तर इंग्रजांनाही लाजवेल अशा जुलमाखाली होता. त्या जुलमाविरोधात एक संन्याशी आपले दंड थोपटून उभा होता, पण त्यापूर्वी त्यांचं जीवन कसं होतं? ३ ऑक्टोबर १९०३ ला विजापूर जिल्ह्यातील सिंदगी येथे भवानराव खेडगीकर यांच्या घरात व्यंकटेशचा जन्म झाला. पुढे संन्यास घेतल्यावर त्यांचं नाव स्वामी रामानंद तीर्थ झालं. सोलापूर, अंमळनेर आणि पुणे येथे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी समाजासाठी काही करायचं ठरवलं. त्यातूनच ते कामगार नेते ना. म. जोशी यांचे खासगी सचिव बनले. पुढे त्यांनी ही नोकरी सोडली आणि हिप्परगा गाठले. तुळजापूर तालुक्यात हिप्परगा येथे अनंतराव कुलकर्णी यांनी एक शाळा काढली होती. पुढे ही शाळा मुक्तिलढ्याचं एक केंद्र बनली. काही वर्षांनंतर त्यांनी हिप्परगा सोडलं आणि अंबाजोगाई येथे योगेश्वरी विद्यालयाची स्थापना केली. निजामाच्या काळात उर्दू शाळांव्यतिरिक्त इतर शाळांना परवानगी मिळणे देखील अशक्यप्राय गोष्ट होती. निजामाचा शाळाचालकांना जाचही असे. अशा कठीण परिस्थितीमध्ये स्वामीजींनी ही शाळा चालवली. हे सर्व करत असताना त्यांच्या डोक्यात स्वातंत्र्याचा विचार घोळत होता. पण त्यासाठी योग्य संधी सापडत नव्हती. १९३७ साली परतूर येथे स्वातंत्र्याची आस असणाऱ्या लोकांचं संमेलन भरलं. या संमेलनाला महाराष्ट्र परिषद असं म्हटलं गेलं. याच ठिकाणी पहिल्यांदा त्यांची ओळख गोविंदभाई श्रॉफ यांच्याशी झाली. दुसऱ्याच वर्षी लातूर येथे महाराष्ट्र परिषदेचं अधिवेशन झालं. त्यामध्ये ते सरचिटणीस झाले. स्वामीजींनी पूर्णवेळ राजकारणात येऊन संघटनेचं काम करावं अशी इच्छा सर्वांनी व्यक्त केली आणि १९३८ मध्ये त्यांचा राजकारणात प्रवेश झाला. देशात काँग्रेसची स्थापना होऊन ५० वर्षं उलटली होती. पण हैदराबाद संस्थानमध्ये काँग्रेसला परवानगी नव्हती. स्टेट काँग्रेसची स्थापना झाली असं घोषित करून सत्याग्रह करू अशी योजना स्वामीजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली होती. त्यानुसार स्टेट काँग्रेसची स्थापना झाल्याचं घोषित करण्यात आलं. वेगवेगळ्या तुकड्यांमध्ये नेत्यांनी सत्याग्रह केला. एका तुकडीत स्वामीजी देखील होते. या सत्याग्रहानंतर त्यांना अटक झाली आणि त्यांची रवानगी चंचलगुडा तुरुंगात करण्यात आली. १९३९ मध्ये स्वामीजींना सोडण्यात आलं. ते गांधीजींना भेटण्यासाठी सेवाग्रामला गेले. गांधीजींना भेटल्यावर त्यांनी सांगितले अनेक राजकीय कार्यकर्ते तुरुंगात आहेत. त्यांच्या सुटकेसाठी उपोषणाची परवानगी मला द्यावी. 'आत्मक्लेशाचा मार्ग राजकारणासाठी वापरायचा नसतो.' असं गांधीजी म्हणत त्यामुळे गांधीजींनी उपोषणाची परवानगी नाकारली. गांधीजींनी स्वामीजींना विचारलं की 'तुम्ही अहिंसा हे तत्त्व जीवननिष्ठा म्हणून स्वीकारलं आहे का. कोणत्याही परिस्थितीमध्ये अहिंसा त्यागणार नाहीत इतकी या तत्त्वावर तुमची अढळ श्रद्धा आहे का? तुम्ही एकटे पडलात कुणीही तुमच्या मदतीला केव्हाही आलं नाही तरी तुम्ही याच तत्त्वावर कायम राहाल का?' स्वामीजी सांगतात 'या प्रश्नाचं उत्तर देण्यासाठी गांधीजींना मला रात्रीचा वेळ दिला होता. संन्यास घेताना देखील मनात इतकी उलथापालथ झाली नाही तितकी यावेळी झाली.' दुसऱ्या दिवशी ते गांधीजींकडे गेले आणि त्यांनी सांगितलं 'मी अहिंसेला अद्याप राजकीय धोरण समजत होतो पण आता मी या तत्त्वाचा जीवननिष्ठा म्हणून स्वीकार केला आहे,' असं म्हणून ते गांधीजींच्या पाया पडले. गांधीजींनी त्यांना आशीर्वाद दिला आणि आणखी काही दिवस माझ्याजवळ थांबा असं सांगितलं. या काळात गांधीजींचा सहवास लाभला. त्याच बरोबर त्यांची कार्यपद्धती समजली. आंदोलनाची दिशा स्पष्ट झाली असं स्वामीजी नमूद करतात. दरम्यान, निजामाच्या पाठिंब्याने तयार झालेल्या इत्तेहाद संघटनेची मुळं घट्ट रोवायला सुरुवात झाली. अनंत भालेरावांनी इत्तेहादचा उल्लेख 'जालीम विषवल्ली' असा केला आहे. रझाकारांचे अत्याचार वाढत गेले तसा त्यांचा प्रतिकार करण्यासाठी गोविंदभाई आणि बाबासाहेब परांजपे यांच्या नेतृत्वात तरुणांचे गट तयार करण्यात आले. हे तरुणाचे गट गावात गस्त घालत, संरक्षण देत, रझाकारांविरोधात लढत. रझाकारांविरोधात पोलीस चकार शब्द काढत नसत. त्यांच्या डोळ्यादेखत हे अत्याचार चालत त्यामुळे लोकांना या तरुणांचाच आधार होता. हैदराबादच्या लढ्याचं स्वरूप पाहता महात्मा गांधींनी स्वातंत्र्यसैनिकांना स्वसंरक्षणासाठी शस्त्र बाळगण्याची परवानगी दिली होती. क्रांतिकारकांना शस्त्र पुरवणं त्यांना शस्त्र चालवण्याचं प्रशिक्षण देणं ही सर्व कामे बाबासाहेब परांजपे यांच्याकडे होते.

# क्रीडापटूंकडून मार्केटिंगचे प्रेरणादायी धडे



नितीन बक्षी
अकोला

मार्केटिंग हा अनेक आयाम असलेला विषय आहे. त्यात विक्रीबरोबरच क्रीडाक्षेत्रातील गुण, शिस्त आणि नैतिक व्यावसायिक दृष्टिकोन यांचाही समावेश होतो. महान व्यक्तिमत्त्वांचे आणि व्यावसायिकांचे जीवन बारकाईने पाहिले, तर या लोकांनी व्यवसायाशी केवळ कठोर परिश्रम, शिस्त आणि सातत्यानेच नव्हे, तर जिद्द, प्रामाणिकपणा आणि समर्पणाच्या भावनेनेही व्यवहार केला असल्याचे जाणवते. क्रीडापटू आणि सामान्य व्यक्ती यांच्यातील फरक पाहिला, तर क्रीडापटूंकडून अनेक मौल्यवान गुण शिकता येतात—परिस्थिती कठीण असतानाही हार न मानणे, खेळाकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे, सातत्याने मेहनत करणे आणि एका ध्येयासाठी पूर्णपणे समर्पित राहणे.

मार्केटिंगमध्येही हेच गुण अत्यंत महत्त्वाचे आहेत. क्रीडाक्षेत्रातील या गुणांचा व्यावसायिक क्षेत्रात उपयोग केल्यास आजच्या मार्केटर्सना तसेच भविष्यातील व्यावसायिकांना निश्चितच फायदा होऊ शकतो. या लेखात मार्केटिंगच्या काही मूलभूत तत्त्वांचा आणि क्रीडापटूंच्या कामगिरीतून त्यातून मिळणाऱ्या शिकवणीचा विचार केला आहे. या तत्त्वांचा आधार मार्केटिंग क्षेत्रातील प्रसिद्ध तज्ज्ञ Philip Kotler यांच्या विचारांवर आहे.

**१. Market Analysis**
**बाजारपेठेचे विश्लेषण**

मार्केटिंगमधील सर्वांत पहिली आणि अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे बाजारपेठेचे सखोल विश्लेषण करणे.

कोणतीही बाजारपेठ समजून न घेता किंवा तिचे सखोल विश्लेषण न करता उत्पादन बाजारात आणण्याचा विचारही करता कामा नये. उत्पादन बाजारात आणण्यापूर्वी अनेक बाबींचा विचार करावा लागतो उत्पादनाचा उद्देश काय आहे? बाजारपेठेचा आकार किती आहे? ग्राहकांच्या गरजा काय आहेत? बाजारपेठेतील अपेक्षित मागणी किती आहे? उत्पादनाची गुणवत्ता कोणत्या स्तराची असावी?

ग्राहकांपर्यंत उत्पादन किती वेळात पोहोचवता येईल?

कच्चा माल सहज उपलब्ध आहे का?

मनुष्यबळ किती लागेल?

उत्पादनाची किंमत किती असावी?

आर्थिकदृष्ट्या हा प्रकल्प व्यवहार्य आहे का? या सर्व बाबींचा विचार केल्यानंतरच उत्पादन बाजारात आणले पाहिजे.

क्रीडापटूंकडून मिळणारा धडा

एखादा क्रीडापटू प्रत्येक सामन्यापूर्वी प्रतिस्पर्ध्याचा अभ्यास करतो. उदाहरणार्थ, सचिन तेंडुलकर प्रत्येक स्पर्धा, प्रत्येक सामना आणि प्रत्येक गोलंदाजाचा अभ्यास करून मैदानात उतरत असे. सामन्यातील परिस्थिती, प्रतिस्पर्ध्याची ताकद-कमकुवत बाजू आणि स्वतःची तयारी यांचा तो गांभीर्याने विचार करत असे.

यातून मार्केटिंग करणाऱ्यांनीही शिकावे की कोणत्याही परिस्थितीचा पूर्ण अभ्यास केल्याशिवाय निर्णय घेऊ नये.

खेळाडू जसा प्रतिस्पर्ध्याचा अभ्यास करून मैदानात उतरतो, त्याचप्रमाणे मार्केटरने बाजारपेठेचा सखोल अभ्यास करूनच उत्पादन बाजारात आणावे.

**२. Product Designing**
**उत्पादनाची रचना**

बाजारपेठेचा अभ्यास केल्यानंतर पुढचा टप्पा म्हणजे ग्राहकांच्या गरजा पूर्ण करणाऱ्या उत्पादनाची रचना करणे.

उत्पादन असे असावे की ते ग्राहकाला अपेक्षित समाधान देईल.

यासाठी क्रीडाक्षेत्रातील एक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे Roger Federer.

फेडररने आपल्या कारकिर्दीत वेगवेगळ्या प्रकारच्या कोर्टवर खेळण्यासाठी आपल्या खेळात आवश्यक ते बदल केले.

ऑस्ट्रेलियन ओपन, फ्रेंच ओपन, विम्बल्डन आणि अमेरिकन ओपन या वेगवेगळ्या स्पर्धांसाठी कोर्टच्या स्वरूपानुसार त्याच्या खेळाची शैली बदलत असे. म्हणजेच परिस्थितीनुसार उत्पादनात किंवा त्याच्या वापरात आवश्यक बदल करण्याची तयारी असणे आवश्यक आहे. ग्राहकांच्या गरजेनुसार उत्पादन तयार करताना केवळ ग्राहकाला जे हवे आहे तेवढेच देणे पुरेसे नाही; त्यापेक्षा काहीतरी अधिक मूल्य देणारे उत्पादन तयार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

ग्राहकांच्या गरजा समजून घेऊन, त्यावर सातत्याने विचार करून आणि नवीन कल्पना स्वीकारून फेडररसारखीच “situation-based” रणनीती मार्केटिंगमध्ये वापरता येते.

**३. Product Pricing**
**उत्पादनाची किंमत निश्चित करणे**

बाजारपेठेच्या गरजेनुसार उत्पादनाची रचना झाल्यानंतर पुढचा महत्त्वाचा प्रश्न असतो—त्याची किंमत किती ठेवायची?

क्रीडाक्षेत्रातील चांगले खेळाडू केवळ पैसा किंवा प्रसिद्धीसाठी खेळत नाहीत. त्यांच्यासाठी खेळातील जिंकण्याची प्रेरणा, खेळाबद्दलची आवड आणि सर्वोत्तम कामगिरी करण्याची इच्छा महत्त्वाची असते.

Tiger Woods याचे एक उदाहरण आहे. त्याने गोल्फमध्ये दीर्घकाळ उत्कृष्ट कामगिरी केली. अनेक अडचणी आणि दुखापतींचा सामना करूनही त्याने पुन्हा मैदानावर पुनरागमन केले. २०११ मध्ये तो काही काळ खेळापासून दूर राहिला आणि त्यानंतर पुन्हा परतला. त्याच्या पुनरागमनामागे केवळ पैसा किंवा प्रसिद्धी नव्हती; सर्वोत्तम कामगिरी करण्याची त्याची जिद्द महत्त्वाची होती.

त्याचप्रमाणे उत्पादनाची किंमत निश्चित करताना केवळ तात्काळ नफा हा उद्देश नसावा. ग्राहकाला मिळणारे मूल्य आणि उत्पादनाची गुणवत्ता यांचा योग्य समतोल साधला पाहिजे.

योग्य किंमत ग्राहकाला आकर्षित करते आणि मार्केटरला बाजारपेठेत टिकवून ठेवण्यासाठी मदत करते.

(पूर्वार्ध.... )





सिटी न्यूज अकोला
३
शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# वृक्षारोपण करून साजरी केली गांधी- शास्त्री जयंती

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर



**अकोला :** मोठी उमरी स्थित कोर्ट कॉलनीतील रहिवाशांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री या महापुरुषांची जयंती आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी केली. महापुरुषांच्या प्रतिमांना केवळ हारार्पण करण्या ऐवजी पर्यावरणाची स्थिती बघत रहिवाशांनी वृक्षारोपण करण्याचे ठरवले. २२ रोपे लावली.

सुधीर देशपांडे, विनोद जकाते, निलेश जोशी, भूषण पातुर्डे, देवराज वडतकर, सतीश खरोडकर, रामेश्वर बानुबाकोडे, अनिल तेल्हारकर यांच्या प्रयत्नातून आदर्श संस्कार मंडळ अकोला यांच्या सौजन्याने झाडांची रोपे व खड्डे सुद्धा करून देण्यात आलेत.

कोर्ट कॉलनी मधील ज्येष्ठ नागरिक तथा टिळक राष्ट्रीय शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक तुळशीराम सातव, विठ्ठलराव निळकंठ यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. माजी सैनिक गंगाधर झामरे तसेच निवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हरिदास काळे ह्यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्याकरिता प्रा. अशोक राहाटे, पंकज जावरकर, विठ्ठलराव भटकर, डॉ. महेश आखाडे, मंगेश सातव , राजेश इंदाने गुरुजी, जाणूनकर, लक्ष्मणराव आगळे यांनी परिश्रम घेतले. वृक्षारोपणाची विशेष बाब म्हणजे जगदीश राहाटे व निधीश जावरकर ह्या तरुणांनी वृक्षारोपण केलेले सर्व झाडांचे संवर्धन करण्याचा निर्धार केला व तशी शपथ सुद्धा घेतली. कार्यक्रमाचा समारोप भाग्यश्री जावरकर, प्रतिभा काळे, वैशाली राहाटे व कविता देशमुख यांनी तयार केलेल्या अल्पाहाराने झाला.

# कोरडा दुष्काळामुळे शेतकऱ्यांची पिके वाचविण्यास धावपळ

## महावितरण कडून टाळाटाळ : दहा दिवसानंतर बसवलेले रोहित्र सुद्धा नादुरूस्त

वि. प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**अकोट:** अकोट तालुक्यातील उमरा सर्कल अंतर्गत शिवपुर शेत शिवार परिसरातील रोहित्र दहा दिवस बंद राहिल्यानंतर सुरू करण्यात आले, तरी त्यावरील वाढत्या भारामुळे पुन्हा वीजपुरवठ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. कमी क्षमतेचे जुने रोहित्र बसविल्याने सर्व कृषी पंपांचा भार तो पेलत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. अनेक शेतकऱ्यांना एक दिवसाआड वीजपुरवठा दिला जात असल्याने सुमारे १०० एकरांवरील फळबागा, कापूस, सोयाबीन व इतर पिके धोक्यात आली आहेत.

यंदा अकोट तालुक्यात पावसाने मोठी दडी मारल्याने शेतकरी आधीच संकटात आहेत. उपलब्ध विहिरी व जलस्रोतांच्या मदतीने पिके वाचविण्याचा प्रयत्न सुरू असताना वीजपुरवठ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दहा दिवस बंद असलेली डीपी दुरुस्त करून सुरू करण्यात आली; मात्र त्या ठिकाणी बसविण्यात आलेले रोहित्र आवश्यक भार सहन करू शकत नसल्याने वारंवार वीज खंडित होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

शेतकऱ्यांच्या माहितीनुसार, डीपी बंद झाल्यानंतर तत्काळ महावितरणकडे तक्रार करण्यात आली होती. संबंधित वायरमन यांनी २१ सप्टेंबर रोजी ऑनलाइन प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला होता. त्यानंतर दुरुस्ती करण्यात आली; मात्र जुनाच कमी क्षमतेचे रोहित्र बसविण्यात आल्याने समस्या कायम राहिली आहे. परिणामी काही शेतकऱ्यांना एक दिवसाआड वीज वापरण्याच्या सूचना देण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे.

या परिस्थितीमुळे सिंचनाचे संपूर्ण नियोजन कोलमडले आहे. पावसाअभावी आधीच कोमेजण्याच्या मार्गावर असलेल्या पिकांना वेळेवर पाणी मिळत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. विशेषतः फळबागांसह पाण्यावर अवलंबून असलेली पिके मोठ्या संकटात सापडली आहेत.

शेतकऱ्यांनी अनेकदा अतिरिक्त क्षमतेचे रोहित्र बसविण्याची मागणी केली; मात्र महावितरणकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे. वारंवार तक्रारी करूनही ठोस उपाययोजना होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना वाढत आहे.

दरम्यान, काही शेतकऱ्यांनी सहाय्यक अभियंता आवळे यांच्याशी संपर्क साधला असता, संबंधित बाबीची माहिती घेऊन कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन मिळाल्याचे सांगितले. मात्र प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताही बदल न झाल्याने शेतकरी नाराज आहेत.

पावसाचा तुटवडा, दुष्काळसदृश परिस्थिती आणि अपुरा वीजपुरवठा यामुळे शेतकऱ्यांसमोर उभी पिके वाचविण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून जास्त क्षमतेचे रोहित्र बसवावा व कृषी वीजपुरवठा नियमित करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवपुर परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

### पिके वाचवायची की एक दिवसाआड वीजेची वाट पाहायची?’

दहा दिवस बंद असलेली डीपी सुरू झाली; मात्र वाढत्या भारामुळे काही शेतकऱ्यांना एक दिवसाआड वीजपुरवठा दिला जात आहे. त्यामुळे महावितरणच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आधीच अल्प पावसामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आता अपुऱ्या वीजपुरवठ्याचा फटका बसत आहे. “पिके वाचविण्यासाठी शेतकरी दिवस-रात्र मेहनत घेत आहेत. मात्र जास्त क्षमतेचे रोहित्र उपलब्ध करून देण्याऐवजी एक दिवसाआड वीजपुरवठ्याचा पर्याय दिला जात असेल, तर पिकांचे होणारे नुकसान कोण भरून काढणार?” असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत.

कोरड्या दुष्काळ परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी अतिरिक्त वीजपुरवठा देण्याबाबतचे निर्देश महसूल मंत्र्यांनी दिले आहेत. मात्र उमरा फिडर मधील घडलेला प्रकार हा संताप जनक असून याबाबत लवकरच जिल्हाधिकारी यांना लेखी तक्रार देऊन महावितरणच्या जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली जाणार असल्याचे शेतकऱ्यांकडून बोलल्या जात आहे.

# मोबाईलचा सत्कार्यासाठी वापर - तरुणांसमोर आदर्श ठरले दिलीप डवले

**अडगाव:** आज तरुण तासनतास मोबाईलवर इन्स्टाग्राम ,रील्स, गेम्स, रमी आणि टाइमपासमध्ये,आपला अमूल्य वेळ वाया घालवत आहे. पण याच मोबाईलचा वापर समाजाच्या भल्यासाठी कसा करावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे अडगावातील दिलीप डवले. दिलीप डवले मोबाईलला केवळ टाइमपासचे साधन न मानता, त्याला जनसेवेचे माध्यम



बनवले आहे. गावातील लाईटची, नळ पाणी योजना, स्वच्छता, सण-उत्सव, शेतकरी, महिलांचे योजना सर्वांपर्यंत पोहोचवतात. त्यांच्या निस्वार्थी आणि सेवाभावाची दखल घेत सामाजिक कार्यकर्त्या सौ. नयनताई अभिजीतआप्पा ढगे व ढगे परिवाराच्या वतीने दिलीप डवले यांना 5G मोबाईल बक्षीस देऊन सन्मानित केले.

# जि. प. वरिष्ठ प्राथमिक शाळेत महात्मा गांधी व शास्त्रीजी जयंती साजरी

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**गाडेगाव:** येथील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेत आज २ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

या विशेष कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवीभाऊ वानखडे आणि उपाध्यक्ष बाळकृष्णभाऊ वाकोडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व



दीपप्रज्वलन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यानिमित्त शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर आधारित अतिशय सुंदर भाषणे दिली. तसेच काही विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते गायली.

या कार्यक्रमाला शाळेतील बुंदे, नवलकर मॅडम, ,शिक्षक वृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन वासनकार यांनी केले.

# सर्वोदय मंडळाचे गांधी व शास्त्री जयंतीनिमित्त कृतिशील अभिवादन

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**अकोला :** महात्मा गांधीचे विचार आजही देशाला प्रेरणादायी आहेत.सर्वांनी व्यसनमुक्तीचा संकल्प करण्याचे आवाहन ज्येष्ठ सर्वोदयी महादेवराव भुईभार यांनी केले. राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अकोला जिल्हा सर्वोदय मंडळाचे वतीने गांधी जवाहर बागेत आयोजित सूत कताई, तरुणाई चरखा प्रशिक्षण कार्यक्रमात बोलत होते. सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड अध्यक्षस्थानी होते.



याप्रसंगी सुमित्रा निखाडे, अशोकराव अमानकर, माजी आमदार अमोल मिटकरी ,श्रीकृष्ण विखे पाटील,ह.मो. खटोड गुरुजी यांनी महात्मा गांधी ,लाल बहादूर शास्त्री यांच्या पुतळ्यास सूत माला घालून अभिवादन केले. कापुस ते कापड अभियान प्रमुख प्रल्हादराव नेमाडे,अक्षय राऊत, ओमप्रकाश वाडेकर,पंढरपूरचे वैद्य सुग्रीव देवकर, श्याम शर्मा यांनी सूत कताई, चरखा प्रशिक्षण ,एक कदम गांधी के साथ याविषयावर संबोधित केले. चरखा हे केवळ सूत कातत नाही तर चरित्र घडवते.चरखा एकाग्रता,संयम शिकवतो आणि स्वावलंबी बनवतो म्हणून आजच्या व्यसनाधीन तरुणाईला चरखा प्रशिक्षणाची गरज आहे असे प्रतिपादन बबनराव कानकिरड यांनी अध्यक्षीय भाषणात केले.

प्रा.डॉ.विवेक हिवरे,शंकरराव सरप, दत्तात्रय गजानन पत्की,अनिल मावळे, जयकृष्ण वाकोडे अकोट,आत्माराम शेळके,गणेशराव अढाऊ, डॉ. जगदीश चिंचोलकर, प्रा. सुहास उदापुरकर, अनुराग मिश्रा,विलास वखरे,भाऊराव गावंडे बाभुळगाव, प्रा.दत्तात्रय भाकरे,हिम्मतराव गावंडे, डॉ.ओमप्रकाश तळोकार, रहमानभाई,अशोकराव पटोकार,सय्यद मुकद्दर,सविता शेळके, पूनम उमाळे, गौरी सरोदे,महेंद्र पाटील, संजय इंगळे, प्रमिला अढाऊ, यशोदाबाई गायकवाड, उमा अग्रवाल, वनिता राऊत, रामराव पाटेखेडे,रविंद्र हुरपडे, प्रा.दिनकर पाटील,अतुल अमानकर, राजेंद्र भटकर,

सत्पालसिंह एललकार, सार्थ तिडके,डॉ.समृद्धी तिडके यांनी चरख्यावर सूत कताई केली. यावेळी नशाबंदी मंडळाकडून व्यसनमुक्ती प्रदर्शन लावण्यात आले होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ.मिलिंद निवाणे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ.शिवचरणसिंह ठाकुर यांनी केले.

# उज्वल कॉन्व्हेंट अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये गांधी जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**बोरगाव मंजू:** स्थानिक उज्वल कॉन्व्हेंट अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नायब तहसीलदार नरेंद्र सोनोने यांच्या प्रमुख उपस्थितीत महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. उज्वला सोनोने यांनीही गांधीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी गांधीजींच्या सत्य, अहिंसा, स्वच्छता, साधेपणा आणि मानवतेच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमास प्रशासकीय अधिकारी सौ. निता बोबडे यांचीही उपस्थिती होती.



गांधीजींच्या विचारांचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा या उद्देशाने विद्यार्थ्यांनी गांधीजींच्या जीवनावर आधारित भाषणे सादर केली तसेच प्रेरणादायी घोषवाक्यांचे प्रदर्शन केले. काही विद्यार्थ्यांनी गांधीजींची वेशभूषा साकारून त्यांच्या विचारांचे प्रभावी सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी साकारलेली गांधीजींच्या तीन माकडांची प्रतिकृती ठरली. “वाईट पाहू नका, वाईट ऐकू नका आणि वाईट बोलू नका” हा संदेश विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे मांडला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शारदा राऊत यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. प्रतीक्षा दळवी यांनी केले. कार्यक्रमाला सौ. मीना वानखेडे, सौ. प्रीती वाघमारे, सौ. दुर्गा असलमोल, सौ. रंजना चवरे, सौ. दीपाली देशमुख, सौ. अश्विनी माहूलकर, सौ. शारदा देशमुख, सौ. मोहिनी इंगळे, सौ. जया हगवने, सौ. रुपाली कडू, सौ. स्वाती जैन तसेच प्रशांत होनाळे यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षकांनी तसेच सौ. पूजा भराटे, रूपाली इंगळे आणि प्रतीक वानखेडे यांनी सहकार्य केले.

# शहर कॉँग्रेस कमिटीच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त अभिवादन

प्रतिनिधी ४ऑक्टोबर

**तेल्हारा:** शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधीजी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्रीजी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी महापुरुषांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमास ज्येष्ठ नेत्या संजीवनी ताई बिहाडे, जिल्हा नेते मोहन अंजनकर, प्रशांत



देशमुख, अॅड श्रीकृष्ण राहणे, डॉ अशोकराव बिहाडे, ओमजी शर्मा, अतुल ढोले, शहराध्यक्ष अॅड संदीप देशमुख, दिनकरराव पहुरकर, फिरोज पठाण, सुशीलाताई घुगे, अनंत सोनमाळे, विनोद पोहरकर, नरेंद्र सुईवाल, शेख अक्रम, शेख अनवर, नजीम शहा, दीपक निकाडे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुर्तीजापूरात कबड्डीचा महासंग्राम; राज्य अजिंक्यपद निवड चाचणीला दिमाखात प्रारंभ

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**मुर्तीजापूर :** मुर्तीजापूरच्या क्रीडा परंपरेला नवे वैभव प्राप्त करून देणाऱ्या ५३व्या ज्युनिअर राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला गुरुवारी सायंकाळी श्री गाडगे महाराज विद्यालयाच्या मैदानावर उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. ‘माई सोशल बहुउद्देशीय क्रीडा मंडळा’च्या वतीने कै. मारुतीआप्पा विठ्ठलआप्पा पिंपळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या या तीनदिवसीय क्रीडा महोत्सवाने कबड्डीचा रंग भरला आहे.

उद्घाटनाचा सोहळा संपताच मैदानावर युवा खेळाडूंच्या दमदार चढाया, भक्कम पकडी आणि प्रत्येक गुणासाठी रंगलेली उत्कंठावर्धक झुंज पाहण्यासाठी क्रीडाप्रेमींनी मोठी गर्दी केली. पहिल्याच दिवशी क्रीडांगण तुडुंब भरल्याने खेळाडूंच्या उत्साहालाही उधाण आले होते.

२ ते ४ ऑक्टोबरदरम्यान




रंगणाऱ्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या ज्युनिअर राज्य कबड्डी संघासाठी खेळाडूंची निवड होणार आहे. त्यामुळे विदर्भातील विविध जिल्ह्यांतून दाखल झालेल्या मुला-मुलींच्या संघांमध्ये सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी कमालीची चुरस पाहायला मिळत आहे. मैदानावर प्रत्येक चढाई आणि पकडीसोबत खेळाडूंच्या कौशल्याची कसोटी लागत असून, युवा कबड्डीपटूंच्या जिद्दीने वातावरण भारून गेले आहे.

या क्रीडा महोत्सवाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार तथा गाडगे महाराज विद्यालय मंडळाचे अध्यक्ष अॅड. सुहासराव तिडके होते. मुख्य आयोजिका व मार्गदर्शिका दुर्गाताई मारुतीआप्पा पिंपळे यांच्या पुढाकारातून ही राज्यस्तरीय निवड चाचणी होत आहे.

उद्घाटन सोहळ्यास कबड्डी महासंघाचे महासचिव तथा अॅम्युचर कबड्डी असोसिएशन ऑफ विदर्भचे अध्यक्ष जितेंद्र सिंह ठाकूर, ज्येष्ठ विधिज्ञ अॅड. मोतीसिंग मोहता, जिल्हा क्रीडा अधिकारी सतीश चंद्रभान, मुर्तीजापूर शहरचे ठाणेदार धर्मेंद्र जोशी, अॅम्युचर कबड्डी असोसिएशन ऑफ विदर्भच्या सचिव सुरेखाताई जगन्नाथ कडू यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी ज्येष्ठ उद्योजक जतिन हरिया, वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेंद्र नेमाडे, बार असोसिएशनचे अध्यक्ष सुनीलजी कांबळे, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता अभय कदम तसेच अॅड. त्रंबकेश्वरज्ञ यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

क्रीडा उपक्रमाला पाठबळ देण्यासाठी अनिल आठवणी, किशोर ठाकूर, सागर सावरी, भारत जेठवाणी, अमोल प्रजापती, माजी ज्येष्ठ कबड्डीपटू राजूभाऊ दहापुते, पूजाताई पिंपळे, मुकेश काळपांडे, विनोद काळपांडे, दिवाकर सुरजुसे यांच्यासह अनेक समाजसेवक, क्रीडाप्रेमी आणि नागरिक उपस्थित होते. बुलढाण्यातून अशोक देशमुख, वाशिममधून श्रीराम भाऊ, यवतमाळमधून नंदूभाऊ वानखडे, नागपूरमधून प्रदीप सेतुकार, चंद्रपूरमधून प्रशांत भाजणे व रवींद्र कोळपे, गडचिरोलीमधून राजेंद्र गडगिलवार, अकोल्यातून केशवराव पातोंड, राजेंद्र नेरकर व मंगलसिंग ठाकूर, तर अमरावतीमधून निखिल बुंदुले यांची उपस्थिती होती.

# महाराजा अग्रसेन जयंती सप्ताहाचे आयोजन

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**अकोला :** सकल अग्रवाल समाजाचे आराध्य महाराजा श्री अग्रसेन यांच्या जयंतीनिमित्त ६ ऑक्टोबरपासून सामाजिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच मुख्य जयंती सोहळा ११ ऑक्टोबरला साजरा होणार असून, याच दिवशी भव्य शोभायात्राही काढण्यात येणार असल्याची माहिती अग्रवाल समितीच्या वतीने शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

मुख्य जयंती सोहळा ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता पोलीस लॉन येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पुणे येथील प्रसिद्ध उद्योजक पवन सराफ तसेच संभाजीनगर येथील उद्योजक डॉ. सुशील भारुका उपस्थित राहणार आहेत.

११ ऑक्टोबरला दुपारी ३.३०



वाजता स्थानिक राणी सती धाम येथून महाराजा अग्रसेन यांची शोभायात्रा काढण्यात येणार आहे. शोभायात्रेत विविध देखावे आणि आकर्षक झांक्या सहभागी होणार आहेत. ही शोभायात्रा गांधी चौक, सिटी कोतवाली, टिळक रोड, जुना कापड बाजार, सराफ बाजार, गांधी चौक आणि तहसील चौक मार्गे अग्रसेन भवन येथे पोहोचेल.

व्यापार उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे स्व. पोकरमल उमाशंकर खेतान यांना अग्रवाल समाजाचा प्रतिष्ठेचा मरणोत्तर ‘अग्र विभूती’ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. याचा समाजबांधवांनी लाभघ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

असे आहेत विविध कार्यक्रम

श्री गणेशपूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ, मुंबईचे मंगलपाठ वाचक कुंदन मिश्रा हे राणी सती दादी यांचा मंगलपाठ सादर करणार, महिला मंडळाच्या वतीने पाककला स्पर्धा, जुन्या दागिन्यांपासून रांगोळी तयार करण्याची स्पर्धा, आनंद मेळावा, ‘राजस्थानी मातीचे रंग, उत्सवाच्या संग’ या विषयावर नाटिका, आरोग्य तपासणी शिबिर, हिरव्या भाज्यांपासून दागिने तयार करण्याची स्पर्धा, त्यानंतर तुळशी कुंडी सजावट स्पर्धा, कथाकथन, जुन्या राख्या व कापडापासून तोरण तयार करणे स्पर्धा, ‘अग्रवाल आयडॉल’, कराओके ट्रॅकवर चित्रपटगीते सादरीकरण, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, मुलांसाठी “ज्युनियर मास्टर शेफ” पाककला स्पर्धा, मुलांसाठी श्लोक व नृत्य स्पर्धा, महिलांसाठी भजनांवर आधारित नृत्य स्पर्धा, संगीत खुर्ची आणि चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.

पत्रकार परिषदेला अग्रवाल समितीचे अध्यक्ष महेंद्र खेतान, उपाध्यक्ष संतोष अग्रवाल, ओम साव, पुरुषोत्तम गुप्ता, सचिव विनोद अग्रवाल, अग्रसेन भवन ट्रस्टचे अध्यक्ष गिरीश अग्रवाल, ट्रस्टचे

सचिव शैलेंद्र कागलीवाल, महिला मंडळाच्या अध्यक्षा मीना बाजोरिया, सचिव सीमा साव, नवयुवक मंडळाचे अध्यक्ष अॅड. केशव अग्रवाल, सचिव धवल अग्रवाल प्रामुख्याने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# रुग्णालयातून पसार आरोपी नागपूर रेल्वे स्थानकावर जेरबंद

## डिजिटल अरेस्ट प्रकरणात शहर पोलिसांनी घेतले ताब्यात

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**यवतमाळ :** वैद्यकीय तपासणीसाठी वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात आणले असताना पोलिसांना चकमा देऊन पसार झालेल्या डिजिटल अरेस्ट प्रकरणातील संशयित आरोपीला यवतमाळ शहर पोलिसांनी अवघ्या काही तासांत नागपूर रेल्वे स्थानकावरून ताब्यात घेतले.

मनोज कुमार राजवीर सिंग (वय ३७, रा. भुवापूर, गाझियाबाद, उत्तर प्रदेश) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.

यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या अपराध क्रमांक ८४८/२०२६ मधील आरोपी मनोज कुमार राजवीर सिंग याला चौकशीच्या अनुषंगाने पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्याच्यावर भारतीय न्याय संहितेतील कलम २०४, ३०८, ३१८(४), ३१९(२), ३३६(३), ३(५) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६६(क), ६६(ड) अन्वये गुन्हा दाखल आहे.

### नागपूरपर्यंत शोधमोहीम

■ रुग्णालयातून पसार झाल्यानंतर आरोपीचा शोध घेण्यासाठी शहर पोलिसांनी विविध पथके सक्रिय केली होती. रुग्णालय परिसर, रस्त्यांवरील सीसीटीव्ही तसेच संभाव्य प्रवासाच्या मार्गांची माहिती घेत पोलिसांनी तपास सुरू ठेवला. अखेर आरोपी नागपूर रेल्वे स्थानकावर असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिस पथकाने तेथे पोहोचून त्याला ताब्यात घेतले.

दरम्यान, २ ऑक्टोबर रोजी आरोपीला वैद्यकीय तपासणीसाठी वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात नेण्यात आले होते. यावेळी पोलिसांना चकमा देत तो रुग्णालयातून पसार झाला. आरोपी पसार झाल्याचे लक्षात येताच शहर पोलिसांनी तातडीने शोधमोहीम हाती घेतली. रुग्णालय परिसरासह संभाव्य मार्गांवरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. रेल्वे स्थानकांसह विविध ठिकाणी आरोपीचा शोध घेण्यात आला.

पोलिसांच्या शोधमोहीमेला यश आले आणि आज पहाटे ३.३० वाजताच्या सुमारास मनोज कुमार राजवीर सिंग याला नागपूर रेल्वे स्थानकावरून ताब्यात घेण्यात आले. सपोनी विकास पाटील, हेड कॉन्स्टेबल १७२१ भरत राठोड, पोलिस कॉन्स्टेबल २७९ पवन तडसे आणि पोलिस कॉन्स्टेबल ५७५ कुणाल पांडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# लोंबकळणाऱ्या वीज तारांमुळे ऊस जळून खाक

## महिला शेतकऱ्याचे लाखोंचे नुकसान; महावितरणकडून भरपाईची मागणी

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**उमरखेड :** शेतातून लोंबकळणाऱ्या वीज तारांच्या घर्षणामुळे उडालेल्या ठिणग्यांनी साडेचार एकरांतील ऊस जळून खाक झाल्याची घटना १ ऑक्टोबर रोजी दुपारी खरूस (बु.) येथे घडली. या घटनेत महिला शेतकरी वंदना श्यामराव वानखेडे यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले.



खरूस (बु.) येथील वंदना

वानखेडे यांच्या सर्वे क्रमांक २१/१ मध्ये १.३५ हेक्टर क्षेत्रात ऊस पीक होते. दुपारी दोनच्या सुमारास रोहित्रावरून येणाऱ्या वीज तारांमध्ये शॉर्टसर्किट होऊन ठिणग्या उडाल्या. या ठिणग्यांमुळे उसाला आग लागली. काही वेळातच आगीने संपूर्ण शेताला वेढा दिल्याने उभे पीक जळून भस्मसात झाले.

दरम्यान, शेतातील लोंबकळणाऱ्या वीज तारांबाबत वंदना वानखेडे यांनी यापूर्वी महावितरण कार्यालयात अनेकदा तक्रारी केल्या होत्या. तारांची दुरुस्ती करण्याची मागणी करूनही दखल घेण्यात आली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

दुष्काळी परिस्थितीत कष्टाने जोपासलेले पीक जळून गेल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. घटनेचा पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. याबाबत तालुका कृषी कार्यालय तसेच उमरखेड पोलीस ठाण्यातही त्यांनी तक्रार दिली आहे.

# पीएम किसानच्या हप्त्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ

## ई-केवायसीसह आधार, लँड सीडिंग पूर्ण करण्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत विशेष मोहीम

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**यवतमाळ :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा नियमित लाभ सुरू ठेवण्यासाठी शेतकऱ्यांना आता प्रलंबित प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी धावपळ करावी लागणार आहे. जिल्ह्यात अद्याप हजारो शेतकऱ्यांची ई-केवायसी, आधार सीडिंग आणि लँड सीडिंगची प्रक्रिया अपूर्ण आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार यवतमाळ जिल्ह्यात २ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

जिल्ह्यात सध्या ३ हजार ५६३ शेतकऱ्यांची ई-केवायसी, ५ हजार २३० शेतकऱ्यांचे आधार सीडिंग आणि ८४९ शेतकऱ्यांचे लँड सीडिंग प्रलंबित आहे. योजनेच्या लाभासाठी या प्रक्रिया पूर्ण असणे आवश्यक करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी कोणतीही दिरंगाई न करता ३१ ऑक्टोबरपूर्वी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. पीएम किसान योजनेच्या डेटाबेसमध्ये असलेल्या अपात्र, मृत किंवा निष्क्रिय लाभार्थ्यांच्या नोंदी काढून टाकण्याबरोबरच पात्र लाभार्थ्यांची माहिती अद्ययावत करण्याचे कामही या मोहिमेत केले जाणार आहे. योजनेची लाभार्थी यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे. लँड सीडिंग अंतर्गत शेतकऱ्याच्या जमिनीची नोंद योजनेच्या पोर्टलशी जोडली जाते. आधार सीडिंग केल्यामुळे बँक खाते आधारशी संलग्न होऊन योजनेचा निधी थेट खात्यात जमा होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे ई-केवायसी पीएम-किसान पोर्टल, पीएम-किसान मोबाईल ॲप किंवा जवळच्या सामूहिक सुविधा केंद्रामार्फत करता येणार आहे. शेतकऱ्यांनी सीएससी केंद्रावर जाऊन फार्मर आयडी काढणेही आवश्यक आहे. विशेष मोहिमेदरम्यान महसूल व कृषी विभाग, ग्रामपंचायत प्रशासन आणि सीएससी केंद्रांचे प्रतिनिधी शेतकऱ्यांना मार्गदर्शन व सहकार्य करणार आहेत. दरम्यान, ३१ ऑक्टोबरनंतरही अनिवार्य प्रक्रिया अपूर्ण राहिलेल्या शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळविण्यासाठी नवीन अर्ज करून पुन्हा पडताळणी प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता ई-केवायसी, आधार सीडिंग, लँड सीडिंग आणि फार्मर आयडीची प्रक्रिया पूर्ण करावी.

# अवैध रेती उपसा : १० तराफे जाळून नष्ट

## अडीच लाखांचे साहित्य भस्मसात; हिंगणी बंधाऱ्यावर महसूल प्रशासनाची कारवाई

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**महागाव :** फुलसावंगी परिसरातील पैनगंगा नदीपात्रातून सुरू असलेल्या कथित अवैध रेती उपशावर महसूल प्रशासनाने शुक्रवारी धडक कारवाई केली. हिंगणी कोल्हापुरी बंधाऱ्याच्या परिसरात करण्यात आलेल्या कारवाईत रेती उपशासाठी वापरण्यात येणारे तब्बल १० तराफे आढळून आले. महसूल पथकाने हे सर्व तराफे जागेवरच जाळून नष्ट केले. या कारवाईत सुमारे अडीच लाख रुपयांचे साहित्य नष्ट झाल्याची माहिती महसूल प्रशासनाने दिली.



पैनगंगा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात रेतीचा उपसा करून ती परिसरातील विविध ठिकाणी साठविली जात असल्याची माहिती महसूल प्रशासनाला मिळाली होती. त्यानुसार परीक्षाधीन उपविभागीय अधिकारी ओमकार एकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने कारवाई केली.

महसूल पथक सकाळी सुमारे ७ वाजता हिंगणी फाटा परिसरात पोहोचले. त्यानंतर पथकाने थेट नदीपात्रात जाऊन पाहणी केली. प्रशासनाचे पथक येत असल्याची चाहूल लागताच रेती उपशाशी संबंधित काही जण वाहनांसह पसार झाल्याची माहिती आहे. त्यामुळे संबंधितांना पकडण्यात प्रशासनाला यश आले नाही. मात्र, नदीपात्रात रेती उपशासाठी वापरण्यात येणारे १० तराफे आढळून आले.

पथकाने सर्व तराफे ताब्यात घेतल्यानंतर ते जागेवरच जाळून नष्ट केले. या कारवाईमुळे अवैध रेती उपशासाठी नदीपात्रात वापरण्यात येणाऱ्या साधनांवर आळा बसण्याची शक्यता आहे.

पैनगंगा नदीपात्रातून अवैधरीत्या रेती उपसा करून ती रस्त्यालगत तसेच परिसरातील विविध ठिकाणी साठवून ठेवली जात असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली आहे. त्यामुळे नदीपात्रातील हालचालींवर महसूल विभागाने लक्ष केंद्रित केले आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचे अवैध उत्खनन रोखण्यासाठी यापुढेही कारवाई सुरू राहणार असल्याचे संकेत या कारवाईतून मिळाले आहेत.

कारवाईत परीक्षाधीन उपविभागीय अधिकारी ओमकार एकाळे, उमरखेडचे मंडळ अधिकारी गजानन सुरोशे, मंडळ अधिकारी गोविंद ठाकरे, तलाठी विनोद ढोणे, पंजाब सानप, आर. जी. राठोड, तसेच महसूल कर्मचारी अक्षय बोनगुलवार, वासुदेव जुकोंडावार, मिलिंद पानपट्टे, योगेश मारकवार, उदल राठोड, कल्याण सोळंकी, संतोष जाधव आणि विश्वंभर भोंगाळे सहभागी झाले होते.

महसूल प्रशासनाच्या अचानक कारवाईमुळे नदीपात्रात अवैध रेती उपसा करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. प्रशासनाने १० तराफे नष्ट केल्याने रेती उपशासाठी वापरल्या जाणाऱ्या साधनांवर मोठा आघात झाला आहे. मात्र, नदीपात्रात पुन्हा अवैध उत्खनन होऊ नये यासाठी नियमित पाहणी आणि सातत्यपूर्ण कारवाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# वित्तीय साक्षरतेसह भांडवली बाजाराचे धडे

## डांगे महाविद्यालयाचा राष्ट्रीय प्रतिभूती बाजार संस्थेसोबत सामंजस्य करार

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**यवतमाळ :** नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबईशी संलग्न कमला यादव डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किन्ही आणि राष्ट्रीय प्रतिभूती बाजार संस्था यांच्यात शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे विद्यार्थ्यांना वित्तीय साक्षरतेसोबतच बचत, गुंतवणूक आणि भांडवली बाजाराचे व्यावहारिक ज्ञान मिळणार आहे.

भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाने स्थापन केलेली राष्ट्रीय प्रतिभूती बाजार संस्था प्रतिभूती बाजाराशी संबंधित शिक्षण, प्रशिक्षण, प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि वित्तीय साक्षरतेच्या क्षेत्रात कार्यरत आहे. या संस्थेच्या सहकार्याने महाविद्यालयातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. वित्तीय नियोजन, म्युच्युअल फंड, प्रतिभूती बाजार, गुंतवणुकीतील जोखीम, बचत व गुंतवणूक तसेच गुंतवणूकदार जागृती या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळणार आहे. विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि परीक्षांबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. तज्ज्ञांची व्याख्याने, कार्यशाळा, प्रशिक्षण सत्रे आणि वित्तीय साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालयात केले जाणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वित्तीय क्षेत्रातील आधुनिक संधी आणि आर्थिक व्यवहारांची शास्त्रीय माहिती मिळावी, या दृष्टीने या कराराला महत्त्व प्राप्त झाले आहे.

प्राचार्य डॉ. नितीन सिंघवी यांनी सांगितले की, वित्तीय साक्षरता हे आजच्या काळातील जीवनोपयोगी कौशल्य आहे. विद्यार्थ्यांना केवळ पदवीधारक न बनविता त्यांच्यात आर्थिक निर्णयक्षमता, कौशल्य आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचा महाविद्यालयाचा प्रयत्न आहे. सोबतचा करार त्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या करारामुळे पदवी शिक्षणासोबत वित्तीय क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान, कौशल्य आणि प्रमाणपत्राधारित शिक्षणाची संधी विद्यार्थ्यांना मिळणार असून, महाविद्यालयाच्या कौशल्याधारित शिक्षणाला यामुळे नवी दिशा मिळणार आहे.

# खैरखेडा ग्रामपंचायतीत गांधी, शास्त्री जयंती

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**पुसद :** तालुक्यातील खैरखेडा ग्रामपंचायत कार्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि देशाचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती २ ऑक्टोबर रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. उपस्थितांनी दोन्ही महापुरुषांच्या कार्याला व विचारांना अभिवादन केले.



कार्यक्रमास ग्रामपंचायत अधिकारी विजय घावस, तलाठी राहुल खाडे, ग्रामपंचायत कर्मचारी योगेश बुरकुले, भीमराव कांबळे तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक अशोक धुळे, रामचंद्र तायडे, शिवाजी ठाकरे, आनंदा कराळे, राजेश लोखंडे, मारुती कोकाटे आणि गोविंदराव भडकारे उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी महात्मा गांधी यांनी देशाला दिलेला सत्य, अहिंसा, स्वच्छता आणि स्वावलंबनाचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा असल्याचे सांगितले. लाल बहादूर शास्त्री यांच्या साध्या राहणीमानासह उच्च विचारसरणीचा आदर्श घेण्याचे आवाहन करण्यात आले.

स्वच्छ भारत अभियानाच्या अनुषंगाने गावात स्वच्छता राखण्याचा तसेच गांधीजींच्या विचारांचा वारसा जपण्याचा संकल्प उपस्थितांनी केला. कार्यक्रम शांततामय व उत्साही वातावरणात पार पडला.

# पेट्रोल पंप हटविण्यासाठी आमरण उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**उमरखेड :** छत्रपती शिवाजी महाराज चौकातील पेट्रोल पंपाच्या परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवरील कथित अतिक्रमणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अतिक्रमणाबाबत पूर्वी अहवाल देऊनही कार्यवाहीस चालढकल होत असल्याचा आरोप करीत सरोज नंदकिशोर देशमुख यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे निवेदन दिले आहे.





तसेच अतिक्रमित पेट्रोल पंप हटविण्याच्या मागणीसाठी १० ऑक्टोबर २०२६ पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

निवेदनानुसार, पेट्रोल पंपाच्या लीज नूतनीकरणाच्या प्रक्रियेदरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाने विस्फोटक नियंत्रक, वर्धा यांच्याशी पत्रव्यवहार केला होता. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केलेल्या अहवालात बांधकाम विभागाच्या जागेत येणाऱ्या पेट्रोल व डिझेलच्या टाक्यांबाबत अतिक्रमणाची नोंद करण्यात आली होती. संबंधित टाक्या काढण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे लीजवाढीच्या आदेशात नमूद असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही न झाल्याने २५ जून रोजी उपोषण करण्यात आले होते. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने २९ जूनच्या पत्राद्वारे आठ दिवसांत टाक्या काढण्याचे लेखी आश्वासन दिल्याचे निवेदनात म्हटले आहे. पुढे अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पाहणी व पडताळणी झाली. उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांच्या आदेशाने १७ जुलै रोजी पुनर्पडताळणीही करण्यात आली.

मात्र, त्यानंतरही कार्यवाही न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. खासगी पेट्रोल पंप कंपनीकडून अतिक्रमण नसल्याचे पत्र प्राप्त झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने पूर्वीच्या अहवालाच्या विरोधात भूमिका घेतल्याचा आक्षेप निवेदनात घेण्यात आला आहे.

या प्रकरणाची चौकशी करून अतिक्रमण आढळल्यास ते तातडीने हटवावे आणि कार्यवाहीस विलंब करणाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी स्वप्निल कनवाळे, दिनेश रावते आणि चांदराव सुरोशे उपस्थित होते.

"प्रशासनाने तातडीने ठोस कार्यवाही न केल्यास १० ऑक्टोबरपासून आमरण उपोषण करण्यात येईल," असा इशारा सरोज नंदकिशोर देशमुख यांनी दिला आहे.

# दृष्टिहीन उद्योजक भावेश भाटिया यांना 'वंदन सन्मान'

## डॉ. प्रकाश आमटे, डॉ. मंदाकिनी आमटे यांच्या हस्ते गौरव; रविवारी यवतमाळात सोहळा

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**यवतमाळ :** सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी स्व. मोहनलाल-शांताबाई राठी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'वंदन सन्मान' सोहळा रविवार, ४ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. बालाजी लॉन, राणी सती मंदिराजवळ, धामणगाव रोड येथे सायंकाळी ४.३० वाजता हा सोहळा होणार आहे.

यंदाचा ११ वा 'वंदन सन्मान' महाबळेश्वर येथील प्रसिद्ध उद्योजक व समाजसेवक भावेश भाटिया यांना प्रदान करण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, मानपत्र आणि एक लाख रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे आणि पद्मश्री डॉ. मंदाकिनी आमटे यांच्या हस्ते भाटिया यांचा गौरव करण्यात येणार आहे.



जन्मतः दृष्टिहीन असलेल्या भावेश भाटिया यांनी महाबळेश्वर येथे 'सनराईज कँडल'ची स्थापना करून मेणबत्ती व्यवसायाला सामाजिक विकासाची जोड दिली. त्यांच्या माध्यमातून जवळपास १० हजार दृष्टिहीनांना रोजगाराची संधी मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले. दृष्टिहीनांसह विविध प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देत त्यांनी व्यवसायाचा विस्तार केला आहे. महाबळेश्वर येथील त्यांच्या संस्थेत ७० हून अधिक दृष्टिहीन विद्यार्थी वास्तव्यास असून 'कमवा आणि शिका' या तत्त्वावर मेणबत्ती उद्योगात कार्यरत आहेत. वि

विध आकारांच्या १५ हजारांहून अधिक सुवासिक मेणबत्त्या येथे तयार केल्या जातात. पर्यटकांसाठी 'वॅक्स म्युझियम'चीही उभारणी करण्यात आली आहे. व्यवसायात काम करणाऱ्या व्यक्तींना भागीदार करून पहिल्या दिवसापासून आर्थिक उत्पन्नाची संधी देण्याची पद्धतही त्यांनी विकसित केली आहे.

### 'सनराईज कँडल'मधून रोजगाराची प्रकाशवाट

■ जन्मतः दृष्टिहीन असलेल्या भावेश भाटिया यांनी महाबळेश्वर येथे 'सनराईज कँडल'ची स्थापना केली. मेणबत्ती उद्योगाच्या माध्यमातून जवळपास १० हजार दृष्टिहीनांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे. संस्थेत ७० हून अधिक दृष्टिहीन विद्यार्थी 'कमवा आणि शिका' तत्त्वावर कार्यरत आहेत. विविध आकारांच्या १५ हजारांहून अधिक सुवासिक मेणबत्त्यांची निर्मिती येथे केली जाते. पर्यटकांसाठी 'वॅक्स म्युझियम'ही उभारण्यात आले आहे.

भावेश भाटिया हे पॅराऑलिम्पिक खेळाडू असून वक्ते, लेखक आणि शायर म्हणूनही परिचित आहेत. त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासातून निर्माण झालेली ही 'प्रकाशवाट' अनेकांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. सोहळ्याला डॉ. अविनाश सावजी, यापूर्वीचे 'वंदन सन्मान'प्राप्त सत्कारमूर्ती तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी सामाजिक क्षेत्रात कार्यरत कार्यकर्त्यांचाही सन्मान करण्यात येणार आहे. राठी परिवाराच्या वतीने आई-वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ आणि त्यांच्या संस्कारातून प्रेरणा घेऊन विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. त्यातूनच 'वंदन सन्मान'ने यवतमाळच्या सामाजिक क्षेत्रात वेगळे स्थान निर्माण केले आहे. नागरिकांनी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी भावेश भाटिया यांच्या प्रेरणादायी यशोगाथेचा परिचय करून घेण्यासाठी सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### ११ वा 'वंदन सन्मान'

- सत्कारमूर्ती : भावेश भाटिया, महाबळेश्वर
- पुरस्काराचे स्वरूप : शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, मानपत्र व एक लाख रुपये
- पुरस्कार वितरण : पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे व पद्मश्री डॉ. मंदाकिनी आमटे
- स्थळ : बालाजी लॉन, राणी सती मंदिराजवळ, धामणगाव रोड, यवतमाळ
- वेळ : रविवार, ४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता

# डोंगरखर्डा ग्रामपंचायतीत गांधी जयंती; ग्रामसभा रद्द

## ग्रामस्वच्छतेची शपथ घेत स्वच्छता अभियान; तंबाखूमुक्तीचाही संदेश

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**कळंब :** तालुक्यातील डोंगरखर्डा ग्रामपंचायतीच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी ग्रामस्वच्छतेची शपथ देऊन ग्रामपंचायत कार्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तसेच आरोग्य विभागाच्या वतीने नागरिकांना बीडी, सिगारेट आणि तंबाखूमुक्तीची शपथ देण्यात आली.



कार्यक्रमाला ग्रामपंचायतीचे उपसरपंच निचल ठाकरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. हाटवार, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थित नागरिकांनी ग्रामस्वच्छता राखण्याची शपथ घेतल्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयासमोरील परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

दरम्यान, गांधी जयंतीनिमित्त नियोजित ग्रामसभा मात्र रद्द करण्यात आली. त्यामुळे ग्रामसभा न घेता केवळ जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला. ग्रामसभेबाबत नागरिकांनी विचारणा केली असता ग्रामविकास अधिकारी तुपट यांनी ग्रामसभा महिन्याच्या अखेरपर्यंत घेता येत असल्याचे सांगितले. ग्रामसभा घेण्यापूर्वी गावात दवंडी देऊन तारीख आणि वेळेबाबत नागरिकांना माहिती देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी आरोग्य विभागाच्या वतीने नागरिकांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. गांधी जयंतीच्या निमित्ताने ग्रामस्वच्छता, आरोग्य संवर्धन आणि व्यसनमुक्तीचा संदेश देण्यात आला.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती



# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण, पाणीटंचाई निवारणाची कामे करावीत

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे निर्देश

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर



**अमरावती:** या वर्षीचा मान्सूनचा कालावधी संपला असून यापुढे पावसाची शक्यता नाही. येत्या काळात पाणीटंचाईचे स्वरूप जाणवणार आहे. त्यामुळे सध्या निर्माण झालेल्या वैश्विक संकटाचा सामना करण्यासाठी जलसंधारण आणि पाणीटंचाई निवारणाच्या कामांवर सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात तालुका दुष्काळ निवारण व व्यवस्थापन आराखडा कार्यशाळा आज पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, उपवनसंरक्षक के. अर्जुना उपस्थित होते. दुष्काळी परिस्थितीबाबत करावयाच्या उपाययोजनांची सुमारे नऊ तास विविध विभागांशी चर्चा करण्यात आली.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी, तालुकानिहाय दुष्काळाची स्थिती जाणून घेतली. त्यासोबतच जिल्ह्यात उपलब्ध असलेला चारा आणि भविष्यात शासनाच्या प्रयत्नातून चाऱ्याचे उत्पादन वाढविण्याबाबत चर्चा केली. सद्यस्थितीत जिल्ह्यात पुरेसा चारा उपलब्ध आहे. शासनाच्या पुढाकारातून गाळपेर जमीन किंवा शासनाच्या जागा उपलब्ध करून चारा उपलब्ध करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. त्यासोबतच उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्यावर कमी पाण्यात रब्बीचे पिके घेणे शक्य आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना गव्हापेक्षा हरभरा, मोहरी आदी कमी पाण्यावर देणाऱ्या पिकांकडे वळविण्याचे आवाहन त्यांनी केले.

मान्सूनचा कालावधी संपलेला असल्यामुळे जलसंधारणाची कामे तातडीने सुरू करता येणे शक्य आहे. ही कामे आतापासूनच सुरू केल्यास येत्या मान्सूनमध्ये अपुरा पाऊस पडला तरी यातून जल पुनर्भरणाची कामे चांगल्या पद्धतीने होऊ शकणार आहे. त्यामुळे सर्व विभागांनी समन्वयाने कामे करून जलसंधारणाच्या कामाला तातडीने सुरुवात करावी. अल निनो हे वैश्विक संकट आहे. मात्र या संकटाचा सामना संधी म्हणून करण्याचा दृष्टिकोन सर्व विभागांनी करावा. पिके घेण्याच्या पद्धती बदल ते जैविक शेती पद्धतीबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरूकता करावी लागणार आहे. त्यासोबतच जलसंधारणाची कामे करताना शेततळे, गाळमुक्त धरण ही कामे तातडीने सुरू करावी. शासनाच्या एकत्रित प्रयत्नामुळे दुष्काळाची झळ कमी होण्यास निश्चितच मदत होईल, असे श्री. येरेकर यांनी यावेळी सांगितले.

# समाजसेविका कांता काळे यांनी योगगुरु रामदेव बाबा, आचार्य बाळकृष्ण यांची घेतली सदिच्छा भेट

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर



**अमरावती:** अमरावती जिल्ह्यात सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजसेविक कांता रमेश काळे यांनी हरिद्वार येथे योगगुरू श्री रामदेव बाबा तसेच आचार्य बाळकृष्ण महाराज यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि जनजागृतीच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या भेटीदरम्यान समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आरोग्य, योग, निरोगी जीवनशैली, महिला सक्षमीकरण तसेच सामाजिक जनजागृती यांसारख्या विविध विषयांवर विचारविनिमय झाला. नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासोबतच योग आणि भारतीय संस्कृतीतील आरोग्यदायी जीवनपद्धतीचा प्रसार करण्यासाठी राबविता येणाऱ्या विविध उपक्रमांबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली.

सौ. कांता रमेश काळे या सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत असून, समाजातील गरजू व वंचित घटकांसाठी सातत्याने कार्यरत आहेत.

त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती जाणून घेत श्री रामदेव बाबा व आचार्य बाळकृष्ण महाराज यांनी समाजहितासाठी सुरू असलेल्या कार्याबाबत सकारात्मक संवाद साधला.

"सुदृढ समाजनिर्मितीसाठी आरोग्य, योग आणि सामाजिक बांधिलकी यांचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे," या भूमिकेतून पुढील काळातही समाजोपयोगी उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा संकल्प सौ. कांता रमेश काळे यांनी व्यक्त केला.

या सदिच्छा भेटीदरम्यान मंगला तायडे, मीना पाटील, सुनीता ठाकरे आणि ललिता चेचरे यांचीही उपस्थिती होती.

हरिद्वार येथे झालेली ही भेट सामाजिक कार्याला व्यापक दिशा देणारी तसेच आरोग्य, योग आणि सामाजिक जनजागृतीच्या कार्याला प्रोत्साहन देणारी ठरली.

# राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन



**अमरावती :** राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी सहायक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार अनिता झाडे, तहसिलदार संतोष आठरे, नायब तहसीलदार श्यामसुदंर देशमुख, यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# नैसर्गिक संकटात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे

## विधान परिषद उपसभापती सचिन अहिर ; शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन केली पाहणी व चर्चा

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर



**अमरावती:** नांदगाव खंडेश्वर परिसरातील गावांमध्ये अतिवृष्टी आणि दुष्काळ अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडले आहेत. शेतकऱ्यांनी हताश होऊ नये. अशा संकट प्रसंगी शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे.अमरावती जिल्ह्यातील सर्वच तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले आहे तातडीने पंचनामे करण्यात येऊन शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल, अशी माहिती विधान परिषद उपसभापती सचिन अहिर यांनी आज येथे दिली.

नांदगाव खंडेश्वर परिसरातील गावांमध्ये अतिवृष्टी व दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी उपसभापती श्री. अहिर यांनी केली.तसेच,सालोड येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना त्यांनी सांत्वन पर भेट दिली. त्यानंतर त्यांनी ही माहिती दिली.

मौजा मुंड निशंकराव येथील दीपक बोलाईत आणि मंगरूळ चव्हाळा येथील जानबाजी पारसकर यांच्या शेतात जाऊन उपसभापती अहिर यांनी सोयाबीन पिकाची पाहणी केली. अतिवृष्टीमुळे शेतातील माती व पीक वाहून गेले. जमीन खरवडली. सोयाबीनला पुरेशा शेंगा धरल्या नाहीत. उत्पादन खर्चही निघेल अशी स्थिती नाही. अशा समस्या शेतकऱ्यांनी मांडल्या. या भागात अतिवृष्टीमुळे शेतीच्या नुकसानी सोबतच राहत्या घरांची पडझड झाली यासंदर्भात उपसभापती श्री अहिर यांनी माहिती जाणून घेतली. प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती त्यांनी जाणून घेतली. शेतकरी व नागरिकांना वेळेत मदत देण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

यानंतर सालोड येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना त्यांनी सांत्वन पर भेट दिली. मुरलीधर वेळूकर यांनी बॅकवॉटर पाण्यामुळे शेतीचे सततचे नुकसान होत असल्याने यावर्षी जुलै महिन्यात आत्महत्या केल्याची माहिती त्यांचे वडील बंधू प्रकाश वेळूकर यांनी दिली. या समस्येमुळे सालोड व परिसरातील शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याची बाब त्यांनी मांडली. हा संपूर्ण विषय समजून घेत अहिर यांनी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना हा विषय सोडविण्यासाठी पाटबंधारे विभागाचे अधिकारी आणि समस्याग्रस्त शेतकऱ्यांची बैठक घेण्याच्या सूचना केल्या. या विषयासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी डिसेंबर महिन्यामध्ये नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. मुरलीधर वेळूकर यांच्या पत्नी वेळूकर,मुलगी समीक्षा आणि मुलगा सार्थक यांची आस्थेने चौकशी करून अहिर यांनी त्यांचे सांत्वन केले व प्रशासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांना आश्वस्त केले.

येथील मनोज फरकाडे या शेतकऱ्याने यावर्षी एप्रिल महिन्यात आत्महत्या केली, त्यांच्या कुटुंबीयांना उपसभापती अहिर यांनी भेट दिली. पत्नी शुभांगी फरकाडे व रुद्रांश (४ वर्ष) आणि शिवराज (८ वर्ष) या मुलांना त्यांनी दिलासा दिला. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना दिली जाणारी मदत या कुटुंबाला मिळाली आहे. यासोबतच लाडकी बहीण योजना, श्रावण बाळ योजना आदी योजनांचा लाभ या कुटुंबाला देण्यात यावा, अशा सूचना त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केल्या. सालोड गावचे सरपंच जगदीश ढगे, उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे, गटविकास अधिकारी स्नेहल शेलार, तालुका कृषी अधिकारी विकास पाटील आणि गावकरी यावेळी उपस्थित होते.

# राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**अमरावती :** राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# समाज कल्याण विभागात 'माहिती अधिकार दिन' साजरा

## सेवा संकल्प अभियानांतर्गत अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घेतली माहिती अधिकाराची उजळणी

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**अमरावती:** प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण आणि सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत २८ सप्टेंबर रोजी 'माहिती अधिकार दिन' साजरा करण्यात आला.

सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी 'माहिती अधिकार अधिनियम २००५' वर आधारित विशेष प्रश्नपत्रिकेच्या माध्यमातून उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून सराव करून घेतला. प्रश्नोत्तरांच्या रंजक फेरीतून माहिती अधिकाराचा अर्ज कसा करावा, प्रथम व द्वितीय अपील प्रक्रिया आणि जन माहिती अधिकाऱ्यांची भूमिका याविषयी सखोल आणि व्यावहारिक उजळणी करण्यात आली. प्रादेशिक उपायुक्त कार्यालयाचे सहाय्यक संचालक डॉ. दिनेश मेटकर यांनी माहिती अधिकार अधिनियमाचा मुख्य उद्देश, प्रशासनातील पारदर्शकता, नागरिकांचे अधिकार याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात माहिती अधिकाराचा प्रभावी आणि सकारात्मक वापर करून नागरिकांना जलद व पारदर्शक सेवा देण्याचा संकल्प उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतला.

# निवृत्तीवेतनधारकांसाठी 'महा-उपलब्धी' अँपची मंगळवारी विशेष कार्यशाळा

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**अमरावती :** लेखा व कोषागारे संचालनालयाने निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी महा-उपलब्धी या मोबाईल ॲपबाबत जनजागृती व मार्गदर्शन करण्यासाठी अमरावती जिल्हा कोषागार कार्यालयात विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा मंगळवार, दि. 6 ऑक्टोबर रोजी सकाळी 11 वाजता जिल्हा कोषागार कार्यालयातील जिजाऊ सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

'महा-उपलब्धी'ॲपच्या माध्यमातून निवृत्तीवेतनासंबंधी विविध सेवा जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध होणार आहेत. निवृत्तीवेतनधारकांना विविध सेवांचा लाभ घेण्यासाठी हे ॲप उपयुक्त ठरणार आहे. वित्त विभागाचे प्रधान सचिव (ले. व को.) ऑनलाइन उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

कोषागार कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी उपस्थित राहून कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कोषागार अधिकारी (निवे.) अमोल इखे यांनी केले आहे.

# ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे खेळाडूंना मिळणार घरबसल्या 'क्रीडा ई-प्रमाणपत्र'

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**अमरावती :** राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळावा यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने खेळाडूंसाठी 'क्रीडा ई-प्रमाण' ही ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत प्रणाली कार्यान्वित केली आहे. या प्रणालीमुळे खेळाडूंना घरी बसून अत्यंत सोप्या पद्धतीने आपले क्रीडा ई-प्रमाणपत्र मिळवता येणार आहे.

ही नवीन प्रणाली ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आहे, ज्यामुळे बोगस प्रमाणपत्रांच्या गैरप्रकारांना पूर्णपणे आळा बसेल. खेळाडूने पोर्टलवर माहिती भरल्यानंतर, ती मूळ डेटाशी जुळल्यास अवघ्या २४ तासांच्या आत डिजिटल पडताळणी अहवाल उपलब्ध होणार आहे. तसेच, प्रत्येक प्रमाणपत्रावर एक क्युआर कोड सुरक्षा असेल. नियुक्ती प्राधिकारी हा क्युआर कोड स्कॅन करून प्रमाणपत्राची सत्यता त्वरित पडताळू शकतील.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच इतर सर्व शासकीय पदभरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंना आता हे 'क्रीडा ई-प्रमाणपत्र' जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. या प्रमाणपत्राशिवाय खेळाडू संवर्गातून अर्जाचा विचार केला जाणार नाही. ज्या खेळाडूंनी यापूर्वी विभागीय उपसंचालकांकडून प्रमाणपत्रांची पडताळणी करून घेतली आहे, त्यांनाही आगामी भरती प्रक्रियेसाठी या नवीन प्रणालीद्वारे प्रमाणपत्र तयार करून घेणे बंधनकारक आहे.

या प्रणाली अंतर्गत ५ टक्के खेळाडू आरक्षणाचे क्रीडा संघटनेमार्फत प्राप्त अभिलेख (रेकॉर्ड्स) 'क्रीडा ई-प्रमाण' पोर्टलवर अपलोड केले जात आहेत. अधिकृत स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंनी प्रमाणपत्र मिळविण्याकरिता क्रीडा विभागाच्या sports.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर आपली नोंदणी पूर्ण करावी आणि प्रमाणपत्र मिळवावे, असे आवाहन क्रीडा विभागाकडून करण्यात आले आहे.

# तोमोई इंग्लिश स्कूलचा जिल्हास्तरीय शालेय बास्केटबॉल स्पर्धेत विजय

## यंदाही पटकावले तब्बल पाच गटांत विजेतेपद!

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर



**अमरावती:** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती व श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ (HVPM), यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अमरावती येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत सूर्यप्रभा प्रतिष्ठान द्वारे संचालित 'तोमोई इंग्लिश मीडियम स्कूल'च्या विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व कामगिरी करत आपली विजयाची परंपरा कायम राखली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही शाळेच्या संघाने आपल्या उत्कृष्ट खेळाच्या बळावर तब्बल पाच वेगवेगळ्या गटांमध्ये विजेतेपद पटकावून स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या ५ गटांमध्ये पटकावले विजेतेपद:

३० सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर २०२६ रोजी पार पडलेल्या या अत्यंत चुरशीच्या जिल्हास्तरीय स्पर्धेत तोमोई स्कूलच्या खालील संघाना सुवर्णयश लाभले:

१. १४ वर्ष वयोगट (मुले) - प्रथम क्रमांक / विजेते

२. १४ वर्ष वयोगट (मुली) - प्रथम क्रमांक / विजेते

३. १७ वर्ष वयोगट (मुले) - प्रथम क्रमांक / विजेते

४. १७ वर्ष वयोगट (मुली) - प्रथम क्रमांक / विजेते

५. १९ वर्ष वयोगट (मुली) - प्रथम क्रमांक / विजेते

शाळेच्या विद्यार्थ्यांनी सर्वच वयोगटांत अप्रतिम खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघांवर आपले वर्चस्व गाजवले. खेळाडूंच्या जिद्दीमुळे, कठोर सराव आणि सांघिक खेळामुळे हा धडाकेबाज विजय सुलभ झाला.

मार्गदर्शन आणि कौतुक:

सूर्यप्रभा प्रतिष्ठानचे पदाधिकारी अध्यक्ष आशा देशमुख मॅडम, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत देशमुख सर , सचिव अरुंधती देशमुख मॅडम , सहसचिव सचिन डहाके सर, कोषाध्यक्ष आदित्य देशमुख सर, वृषाली देशमुख मॅडम ,

शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली आवळे मॅडम व उपमुख्याध्यापिका मेघना मीटकरी मॅडम,समन्वयक सतीश चौधरी सर तसेच विद्यार्थ्यांच्या या रुबाबदार यशामागे क्रीडा शिक्षक प्रवीण चौधरी सर, नरेंद्र तायडे सर,गौरव मोहोड सर आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीयांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले. दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यालयाने मिळवलेल्या या उज्ज्वल यशाबद्दल शाळा परिसरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण असून, सर्व स्तरातून विजेत्या खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# 'जीवन ज्योत' कडून मोफत नेत्रसेवेचा उपक्रम

## नेत्रदान, देहदान व अवयवदानासाठी जनजागृती

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर



**अमरावती :** समाजातील गरजू नागरिकांना मदत करण्याबरोबरच नेत्रदान, देहदान आणि अवयवदानाचे महत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने'जीवन ज्योत नेत्रदान, देहदान एवं अंगदान समिती'ची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असून गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे. अशी माहिती श्रमिक पत्रकार संघाच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

समितीच्या माध्यमातून गरजू रुग्णांसाठी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच नेत्र तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच डॉ. पंकज गाडे यांच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या फेको मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी अत्यल्प खर्चात सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे समितीने सांगितले. या उपक्रमासाठी आवश्यक असलेल्या शेष खर्चासाठी विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने मदत केली जाणार आहे.

आर्थिक अडचणींमुळे कोणतीही व्यक्ती उपचारापासून वंचित राहू नये, तसेच नेत्रदान, देहदान आणि अवयवदानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने समितीच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. समितीच्या कार्यकारिणीत अध्यक्ष चंद्रकांत पोपट, सचिव डॉ. नंदकिशोर लोहाना, कोषाध्यक्ष पुरुषोत्तम हब लानी यांच्यासह नेत्रदान समिती प्रमुख म्हणून सुरेश वघानी, देहदान समिती प्रमुख डॉ. पंकज गाडे, अवयवदान समिती प्रमुख डॉ. सिकंदर आडवाणी तसेच मोतीबिंदू ऑपरेशन व नेत्र तपासणी शिबिर प्रमुख म्हणून राजू मंडूडा यांचा समावेश आहे.

मोतीबिंदू ऑपरेशनसाठी राजू मंडूडा – मॉडर्न इलेक्ट्रॉनिक मॉल, राजेश प्लॉट तसेच चंद्रकांत पोपट – स्पर्धा केंद्र, राजापेठ, पुरुषोत्तम हवलानी – आराधना फॅशन, जवाहर रोड यांच्याशी संपर्क साधता येईल. नेत्रदानासाठी सुरेश वघानी (मो. 98232 05411) व डॉ. नंदकिशोर लोहाना (मो. 94052 33039), अवयवदानासाठी डॉ. सिकंदर आडवाणी (मो. 80805 38365) तर देहदानासाठी डॉ. पंकज गाडे (मो. 77760 99911) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

समाजहित, मानवसेवा आणि गरजूंच्या मदतीचा संकल्प घेऊन सुरू करण्यात आलेल्या या 'जीवन ज्योत' सामाजिक उपक्रमास नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## जिल्ह्यात पाणी टंचाईचे सावट...

**वाशीम** : पावसाने दिड महिन्यापासून दडी मारल्यामुळे पिकांचे नुकसान झाले तर दुसरीकडे पाणी टंचाईचे सावट निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील जलस्त्रोत्रानी आताच तळ गाठला असून शासनाने पाणी आरक्षण करणे सुरू केले आहे. आतापासूनच पाणी टंचाई निर्माण झाली असून येणाऱ्या काळात हे संकट अधिकच गडद होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने पाणी टंचाई निवारणासाठी पुढाकार घेवून योग्य त्या उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. सध्या स्थितीत परतीच्या पावसाने साथ न दिल्याने शेतकऱ्यांच्या हातचे पिके गेले. तर दुसरीकडे चारा टंचाई निर्माण झाली .तिसरीकडे पाणी टंचाईचे सावट जिल्ह्यावर निर्माण झाले आहे.



# दुष्काळाची हानी, पाण्याची आणीबाणी !

## *अशक्य गोष्ट कशी शक्य होणार, एकबुर्जीची उंची कशी वाढणार





● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम जिल्हा आकांक्षीत जिल्ह्याच्या यादीत नोंद आहे. जिल्ह्याची आर्थिक व्यवस्थाही शेतीवरच अवंलबून आहे. शेती पाण्यावर अवंलबून आहे. यावर्षी दुष्काळामुळे जिल्ह्यातील धरणामध्ये अत्यल्प पाण्याचा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे आता एकबुर्जीच्या धरणाची उंची वाढविण्याची मागणी होत आहे. मात्र तांत्रिक दृष्ट्या शक्य नसल्याने त्या ऐवजी उपलब्ध असलेल्या जलसाठ्याना कमी खर्चात जिवंत करून पाणी टंचाईवर मात करण्याची गरज आहे.

वाशिम जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आपल्याच जिल्ह्यातील कोणत्याही समस्यांचा खोलवर अभ्यास करीत नसल्याचे हे प्रातिनिधिक उदाहरण आहे. 'एकबुर्जी' धरणाची उंची वाढवणे हे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसल्याचे या पूर्वीच राज्य शासनाने व संबंधित विभागाने जाहीर केले आहे. तरी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी ' एकबुर्जी ' धरणाची उंची वाढवा अशी मागणी अधून मधून करून वर्तमानपत्रात बातम्या छापून आणतात. या पूर्वी माजी आमदार ही हीच मागणी करीत असायचे, विद्यमान आमदार ही निवडून आल्यावर सुरुवातीच्या पत्रकार परिषदेत ' एकबुर्जी धरणाची उंची वाढवण्यासाठी प्रयत्न करणार' अशी घोषणा केली होती. परंतु सदर पत्रकार परिषदेला उपस्थित असलेल्या पत्रकारांनी त्यांना सांगितले की ते तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही. तेव्हा ते त्यांनी समजून घेतले पण काही प्रतिनिधी ' एकबुर्जी' प्रकल्पाच्या उंचीची टिमकी अजून ही वाजवतात. याचाच अर्थ यांना आपल्याच जिल्ह्यातील प्रश्न व समस्यांचा अभ्यास नाही. म्हणून अशा मागण्या अधून मधून पुढे येतात. त्या ऐवजी धरणातील गाळ काढून पाण्याच्या साठ्यात वाढ करावे लागणार आहे. या कडे लक्ष्य देण्याची गरज आहे.आपला जिल्हा 'गोदावरी व तापी' नदी खोऱ्याच्या मध्यरेषेवर असल्याने जिल्ह्यात मोठे सिंचन प्रकल्प उभे राहू शकत नाहीत.

त्या ऐवजी वाशीम शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी ' इसापूर प्रकल्पातून पाईप लाइनद्वारे पाणी आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेच आहे. त्या साठी प्रयत्न करावे लागणार आहेत वेळ पडली तर जन आंदोलन ही उभारावे लागेल. तसेच वाशीम शहर पूर्वी तलावाचे शहर म्हणून ओळखले जात होते. पण शहराच्या विस्तारीकरणात हे तलाव बुजवल्या गेले. पण आता ही जिल्ह्यातील नैसर्गिक जलस्त्रोतांचे पुनर्जीवन करू शकतो. जुन्या विहिरी बुजवल्या आहेत, त्याचा उपसा करा, त्याची पुनर्बांधणी करा त्याचा फायदाच होईल. ' वैनगंगा - नळगंगा नदी जोड प्रकल्पाचा' ही जिल्ह्याला फारसा फायदा होणार नाही. तसेच हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी किती काळ लागेल हे सध्या तरी सांगता येत नाही. लोकप्रतिनिधींनी 'पाणी' या विषयावर जिल्ह्यातील विविध अभ्यासू लोकांशी चर्चा करून काही ' रोड मॅप' तयार करून पक्ष विरहित दबावगट निर्माण करावा आणि शासनाकडे मागण्या रेटाव्यात अस मला वाटत. जिल्ह्यात केवळ माजी राज्यमंत्री सुभाष ठाकरे आणि माजी आमदार दिवंगत सुरेश इंगळे यांनी सिंचनासाठी खूपच अतुलनीय दीर्घकालीन उल्लेखनीय कार्य केले आहे. जिल्ह्यातील बॅरेजेस ही त्यांचीच देण होय.

## दुष्काळाचा करण्यासाठी अंत, नैसर्गीक जलस्त्रोत्र करा जिवंत !

पाझर तलाव, सिंचन तलाव, छोटे-मोठे धरणे व बंधाऱ्यांची दुरुस्ती, नदी - नाले खोलीकरण करून वाढवा पाणी साठवण क्षमता नैसर्गिक जल स्तोत्रांना जिवंत करा सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवडे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



वाशीम जिल्हा आकांशीत आहे मागासलेला आहे याचे कारण देऊ नका, दूष्काळाच्या झळा वारंवार सोसणाऱ्या वाशिम जिल्ह्यात भविष्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी पाझर तलाव, सिंचन तलाव, छोटे-मोठे धरणे, बंधारे, नदी नाल्याचे खोलीकरण करावे , नैसर्गिक जल स्तोत्र आहे त्यांना जिवंत करावे व तातडीने दुरुस्ती करून पाणी साठवण क्षमता वाढवावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवडे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करण्यात आले आहे. वाशिम जिल्ह्यात अनेक ठिकाणी पाझर तलाव व सिंचन तलावांची स्थिती दुरवस्थेत असून, काही ठिकाणी तलावातील गाळ काढणे, भिंती व बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच नद्या व पाझर तलावांवरील बंधारे मजबूत करून पाणी अडविण्याची क्षमता वाढविण्याची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.शासनाच्या 'पाणी अडवा, पाणी जिरवा' यासह विविध जलसंधारण योजनांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च होत असला तरी अनेक कामांचे योग्य नियोजन व प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची खंत देवढे यांनी व्यक्त केली आहे.

केवळ निधी खर्च करण्याऐवजी दीर्घकालीन परिणाम साधणाऱ्या कामांना प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की, जिल्ह्यात काही ठिकाणी पाणी साठवण क्षमतेत वाढ केल्यास मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होऊ शकते.

पूर्वी काही जलसंधारण कामे झालेल्या ठिकाणी आजही पाणी साठून राहत असल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे अशा यशस्वी कामांचा अभ्यास करून जिल्ह्यातील इतर ठिकाणीही त्याच धर्तीवर नियोजन करण्याची गरज आहे.दरम्यान, शासनाकडून विविध विकास कामांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जात असताना, ग्रामीण भागातील नागरिक व शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या पाणी साठवण आणि जलसंधारणाच्या कामांकडे विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे.

पावसाचे पाणी वाहून जाण्यापासून रोखून ते जमिनीत मुरविण्यासाठी व साठविण्यासाठी व्यापक नियोजन झाल्यास भविष्यातील पाणीटंचाई कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.वाशिम जिल्ह्यात पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठीही अनेकदा टंचाईची परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे पाणी उपलब्धतेसाठी दरवर्षी केवळ तात्पुरत्या उपाययोजना करण्याऐवजी कायमस्वरूपी जलसंधारणाची कामे हाती घेण्यात यावीत, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. पाणी साठवणुकीचे प्रभावी नियोजन झाले, तर भविष्यातील पाणीटंचाईवर मोठ्या प्रमाणात मात करता येईल. वाशिम जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती कायमची दूर करण्यासाठी शासनाने जलसंधारणाच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे,' अशी मागणी सुभाष देवडे पाटील यांनी केली आहे.

## एकबुर्जी प्रकल्पात अत्यल्प पाणी

### पेनगंगा नदीतून पाणी उपासा करा - नगरसेवक पुरण बदलानी



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या एकबुर्जी प्रकल्पामध्ये सध्या अत्यल्प जलसाठा शिल्लक राहिल्याने भविष्यात गंभीर पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर १२ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेली 'वाशिम शहर तातडीची पाणीपुरवठा योजना' तात्काळ कार्यान्वित इुकरून पैनगंगा नदीवरील कोकलगाव बॅरेजमधून पाणी उपसा करून एकबुर्जी प्रकल्पात सोडण्याची मागणी नगरसेवक पुरण बदलानी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. मात्र, हे निवेदन देऊन तब्बल २ महिन्यानंतरही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



## २८ जुलै रोजी प्रशासनाला निवेदन देवून केले होते सावध...

नगरसेवक बदलानी यांनी दिलेल्या निवेदनानुसार, वाशिम शहरावर आगामी काळात एल निनोच्या प्रभावामुळे दुष्काळाचे सावट निर्माण होण्याची शक्यता असून, अत्यल्प जलसाठ्यामुळे शहरासमोर पाणीटंचाईचे संकट उभे राहू शकते. ही परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने आणीबाणीच्या काळात शहराला दिलासा मिळावा यासाठी जवळपास १२ कोटी रुपये खर्चून 'वाशिम शहर तातडीची पाणीपुरवठा योजना' राबवली होती.या योजनेअंतर्गत २०१८ मध्ये पैनगंगा नदीवरील कोकलगाव बॅरेजपासून एकबुर्जी धरणापर्यंत सुमारे १२ किलोमीटर लांबीची मुख्य जलवाहिनी टाकण्यात आली. या माध्यमातून नदीतील पाणी उपसा करून एकबुर्जी प्रकल्पात सोडण्याची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र, योजना पूर्ण झाल्यानंतर आजपर्यंत या पायाभूत सुविधेचा प्रभावी वापर करण्यात आलेला नसल्याचे बदलानी यांनी नमूद केले आहे.सध्या जागतिक हवामान बदल आणि एल निनोच्या प्रभावामुळे पावसाबाबत अनिश्चितता निर्माण झाली असून, एकबुर्जी धरणातील जलसाठा केवळ ४ टक्क्यांवर येणे ही धोक्याची घंटा असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पैनगंगा नदीला सध्या पाणी उपलब्ध असताना आणि कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेली जलवाहिनी अस्तित्वात असताना केवळ नियोजनाअभावी शहराला पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, असेही त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे.जर तातडीने पैनगंगा नदीतून पाणी उपसा करून एकबुर्जी प्रकल्पात सोडण्यात आले, तर संभाव्य जलसंकट टाळता येऊ शकते. त्यामुळे प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता तातडीची पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करून आवश्यक आदेश द्यावेत, अशी मागणी नगरसेवक पुरण बदलानी यांनी केली आहे.दरम्यान, निवेदन सादर करून दहा दिवस उलटूनही प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही किंवा अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नसल्याने शहरातील नागरिकांमध्ये पाणीपुरवठ्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. आता जिल्हा प्रशासन यावर कोणता निर्णय घेते, याकडे वाशिमकरांचे लक्ष लागले आहे.

## नवोदय विद्यालयाला 'चार स्टार'ग्रिहा मानांकन

### ऊर्जा संवर्धन, पाणी बचत, कचरा व्यवस्थापनासह शाश्वत उपक्रमांचा गौरव

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

पर्यावरणपूरक, ऊर्जा-कार्यक्षम आणि शाश्वत शैक्षणिक पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय, वाशिमला 4Star GRIHA for Existing School हे मानांकन मिळाले आहे. पुणे येथे झालेल्या GRIHA Regional Conclave २०२६ मध्ये विद्यालयाला हे मानांकन प्रदान करण्यात आले.

GRIHA CouncilUUee वतीने Pathways for a Low CaRon Future: Buildings to Infrastructure या संकल्पनेवर आयोजित या परिषदेत पर्यावरणपूरक बांधकाम, ऊर्जा संवर्धन, पाणी व





नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर, कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत विकास या विषयांवर चर्चा झाली.

विद्यालयात ऊर्जा बचत, पाणी संवर्धन, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन तसेच नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात. निवासी विद्यालय असल्याने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैली आणि शाश्वत विकासाची जाणीव निर्माण करण्यावरही भर दिला जात आहे. या सर्व बाबींची दखल घेत विद्यालयाला चार स्टार GRIHA मानांकन देण्यात आले.

या सोहळ्यात विद्यालयाचे प्राचार्य सचिन डी. खरात यांच्या वतीने PGT (Computer Science) अनिकेत पल्लेवाड यांनी GRIHA Rating Plaque स्वीकारले.

**सामूहिक प्रयत्नांची पावती**

हे मानांकन केवळ विद्यालयाच्या पायाभूत सुविधांचा गौरव नसून शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सामूहिक सहभागातून निर्माण झालेल्या पर्यावरणपूरक कार्यसंस्कृतीची पावती असल्याचे प्राचार्य सचिन डी. खरात यांनी सांगितले. या गौरवाबद्दल त्यांनी विद्यालयाशी संबंधित सर्व घटकांचे अभिनंदन केले.वाशिम जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी हा बहुमान महत्त्वपूर्ण मानला जात असून, पर्यावरण संवर्धनासोबतच गुणवत्तापूर्ण आणि शाश्वत शिक्षणाच्या दिशेने विद्यालयाच्या वाटचालीला यामुळे नवी प्रेरणा मिळाली आहे.

## थोडक्यात

### सेवा संकल्प अभियानांतर्गत पोहरादेवी येथे आरोग्य शिबिर

● सिटी न्युज ब्युरो @ पिंप्री अवगण ●



परमहंस झोलेबाबा विद्यालय तथा स्व.मधुकरराव ल.सपकाळ कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय,पिंप्री अवगण येथे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव तथा प्राचार्य मा.श्री.सुनील सपकाळ हे होते.तसेच कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री.राठोड सर व पालक समितीचे अध्यक्ष श्री. दिलीपजी अवगण हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.मनीष दीक्षित सर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. चेतन वानखडे सर यांनी केले.प्रमुख वक्ते श्री दिलीपजी अवगण यांनी लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य श्री.सुनील सपकाळ यांनी लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिक -पणा, देशभक्ती आणि कर्तव्यनिष्ठेचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन केले.

## शेतकऱ्यांना पाण्यासाठी बंदी, उद्योगांना संधी !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

*परवाने रद्द, कृषी मोटरपंप जप्तीचे आदेश.
*मोठ्या प्रकल्पातील पाणी कारखाने,
*उद्योगांना मिळते. मग, शेतकऱ्यांचीच अडवणूक का ?



एकीकडे वरुणराजाने पाठ फिरवल्याने खरीप हातातून गेलं, आणि दुसरीकडे लघु पाटबंधारे विभागाने शेतकऱ्यांच्या तोंडचं पाणी पळवलं आहे. जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंता, ल.पा. जि.प. वाशिम यांनी दि. ०२/१०/२०२६ रोजी एक सक्त आदेश (जा.क्र/लसिवि/ जिप/वा /३६८३१७५/२६) काढून जिल्ह्यातील ४९९ तलावांमधून होणारा सर्व प्रकारचा पाणी उपसा (अवैध उपसा तसेच तात्पुरते रद्द केलेले परवाने) तात्काळ रोखण्याचे फर्मान सोडले आहे.

**काय आहे फतव्यात?**

एल-निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमान घटल्याने जिल्ह्यात दुष्काळ जाहीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर तलावातील पाणी पिण्यासाठी, जनावरांसाठी व अत्यावश्यक गरजांसाठी आरक्षित ठेवणे आवश्यक असल्याचे कारण देत, परवानाधारकांचे परवाने सुद्धा तात्पुरत्या कालावधीसाठी रद्द करण्यात आले आहेत.

आदेशानुसार आता तलावातून कोणत्याही प्रकारचा उपसा करण्यास परवानगी नाही. विनापरवाना उपसा बेकायदेशीर असून ज्यांच्याकडे यापूर्वी परवाना होता, त्यांनीही परवाने रद्द असताना उपसा केल्यास तो अवैध उपसा समजण्यात येईल. पंप, मोटर, इंजिन/ पाईप लाईनद्वारे होणारा उपसा दिसल्यास पंप, मोटर, पाइप जप्त करून कायद्याप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश आहेत. यासाठी गटविकास अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक, जलसुरक्षक यांची गावस्तरीय दक्षता समिती गठीत करून प्रत्येक सोमवारी अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. हलगर्जीपणा केल्यास संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. वाशिम यांनी दिला आहे. या निर्णयाने उपसा सिंचनावर अवलंबून असलेल्या शेकडो शेतकऱ्यांची झोप उडाली असून ,आरक्षित पाणी कुणासाठी.? असा सवाल उपस्थित केला जात आहे. शासन म्हणते पाणी पिण्यासाठी आरक्षित. पण प्रत्यक्षात याच तलावातील पाणी गावात नळाद्वारे पोहोचतच नाही. मग आरक्षित पाणी तलावातच आटून जाणार का?

**खरीप हातातून गेला, आता बागायती शेती पण धोक्यात.**



अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून केळी, भाजीपाला, फळबागा लावल्या आहेत. उपसा बंद झाल्यास बागा जळून जातील. खरीप गेलं, आता बागायती सुद्धा घालवायची का? दुजाभाव का? मोठ्या प्रकल्पातील पाणी कारखाने, उद्योगांना मिळते, मग छोट्या शेतकऱ्याच्या तोंडचे पाणी का पळवले जात आहे? शेतकऱ्यांनी जगायचं कसं? असे विविध प्रश्न उपस्थित होत आहेत.

**शेतकऱ्यांची मागणी.**

शासनाने सरसकट उपसा बंद करण्याऐवजी, तलावात उपलब्ध पाण्याचे वास्तविक ऑडिट करावे. पिण्यासाठी लागणारे पाणी वजा जाता, उर्वरित पाणी शेतीसाठी नियंत्रित वेळेत द्यावे. अन्यथा हा दुष्काळ शेतकऱ्यांसाठी तेरावा महिना ठरेल.

असा सवाल सुद्धा शेतकरी विचारत आहेत.

## ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त सावगाव येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या 'किमान समान कार्यक्रम' (Common Minimum Programme) अंतर्गत जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त १ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता सावगाव येथील साई आश्रय वृद्धाश्रमात कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर बी. जी. चोरखंडे होते. प्रमुख उपस्थितीत साई आश्रय वृद्धाश्रमाच्या अध्यक्षा मंदाताई राजेंद्र आखाडे, सचिव आशिष उद्धवराव राऊत, जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड. वैभव टिपणे तसेच मुख्य न्याय दंडाधिकारी ॲड. परमेश्वर आ. शेळके उपस्थित होते.यावेळी ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या NALSA (Legal Services to Senior Citizens) एम्पस, २०१६, ज्येष्ठ नागरिक व पालक निवृत्ती व कल्याण अधिनियम २००७ तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. तसेच NALSA हेल्पलाइन क्रमांक १५१०० आणि NALSA पोर्टलबाबत जनजागृती करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. परमेश्वर शेळके यांनी केले. संबंधित वृद्धाश्रमातील कर्मचाऱ्यांनी आभार प्रदर्शन केले.

# दुष्काळात मुलींनी जावे कुठे

## 50 वर्षे जुन्या इमारतीमुळे लेडी हार्डिंग महिला वसतिगृह रिकामे करण्याचे आदेश

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर







**अकोला :** एकीकडे जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे विद्यार्थिनी आणि त्यांच्या कुटुंबीयांसमोर आर्थिक संकट उभे असताना, दुसरीकडे लेडी हार्डिंग महिला वसतिगृहातील RANM विद्यार्थिनींना वसतिगृह खाली करण्याचे आदेश देण्यात आल्याने त्यांच्या निवासाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तब्बल ५० वर्षे पूर्ण झालेल्या या इमारतीबाबत प्रशासनाकडून आतापर्यंत तीन वेळा वसतिगृह रिकामे करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती आहे. लेडी हार्डिंग महिला वसतिगृहाच्या इमारतीला ५० वर्षे पूर्ण झाल्याने तिच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वसतिगृह खाली करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, वसतिगृह रिकामे करण्यापूर्वी विद्यार्थिनींसाठी पर्यायी व्यवस्था कुठे आहे? असा सवाल आता उपस्थित होत आहे.RANM अभ्यासक्रमासाठी विविध भागांतून मुली अकोल्यात शिक्षणासाठी येतात. आर्थिकदृष्ट्या सर्वांना स्वतंत्रपणे खोली घेऊन राहणे शक्य नसते. अशा परिस्थितीत वसतिगृहच बंद अथवा रिकामे करण्यात आल्यास विद्यार्थिनींच्या शिक्षणावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे जिल्ह्यात सध्या पावसातील खंड आणि वाढत्या खर्चामुळे ग्रामीण भागातील कुटुंबांवर आर्थिक ताण आहे. अशा परिस्थितीत मुलींना वसतिगृहातून बाहेर काढण्यापूर्वी पर्यायी सुरक्षित निवासाची व्यवस्था करणे प्रशासनाची जबाबदारी नाही का? असा प्रश्न पालकांकडून उपस्थित होण्याची शक्यता आहे.

### तीन आदेश, मात्र पर्यायी व्यवस्थेचे काय?

» इमारत जुनी असल्याने वसतिगृह खाली करण्याचे आदेश तीन वेळा देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, आदेश देण्यापेक्षा पुढे जाऊन विद्यार्थिनींच्या निवासाची कायमस्वरूपी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. इमारत धोकादायक असेल तर मुलींच्या सुरक्षिततेशी तडजोड नको; पण सुरक्षित पर्यायाशिवाय वसतिगृह खाली करण्याचा निर्णयही विद्यार्थिनींसाठी संकट वाढवणारा ठरू शकतो.

### प्रशासनासमोर दुहेरी आव्हान

» एकीकडे जुन्या इमारतीमुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न, तर दुसरीकडे वसतिगृह रिकामे केल्यानंतर त्यांच्या निवासाचा प्रश्न, अशी दुहेरी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने पर्यायी वसतिगृहाची व्यवस्था, इमारतीच्या सुरक्षिततेबाबतचा तांत्रिक अहवाल आणि विद्यार्थिनींच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था याबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करण्याची गरज आहे.

# एसपी बंगल्याच्या परिसराला अतिक्रमणाचा विळखा, कारवाई कधी?



प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**अकोला:** शहरात अतिक्रमणा विरोधात महापालिकेकडून वेळोवेळी कारवाई केली जाते. मात्र, एसपी बंगल्यालगतच्या परिसरात रस्त्याच्या कडेला विविध विक्रेत्यांकडून जागेचा वापर केला जात असल्याचा मुद्दा समोर आला आहे. त्यामुळे सर्वसामान्य भागातील अतिक्रमणावर कारवाई होत असेल, तर या परिसरात कारवाई कधी होणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

अकोला शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे... शहरातील विविध भागांमध्ये महापालिकेकडून अतिक्रमण हटाव मोहीम राबवली जाते. रस्त्याच्या कडेला किंवा सार्वजनिक जागेवर व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई केली जाते. मात्र, एसपी बंगल्याच्या बाजूच्या परिसरातही रस्त्यालगत विविध प्रकारचे अतिक्रमण असल्याचे चित्र दिसून येत आहे.या परिसरात झाडे विक्रेते, कुंड्या विक्रेते तसेच लहान मुलांची खेळणी विकणारे व्यावसायिक रस्त्यालगत जागेचा वापर करत असल्याचे दिसते. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतोय का, सार्वजनिक जागेचा वापर नियमानुसार होतोय का, हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

विशेष म्हणजे, शहराच्या इतर भागांमध्ये अतिक्रमण हटवण्यासाठी महापालिकेकडून कारवाई केली जाते. मग एसपी बंगल्यालगतच्या या परिसरातील अतिक्रमणाकडे प्रशासनाचे लक्ष का जात नाही? नियम सर्वांसाठी समान असतील, तर या ठिकाणीही संबंधित विभागाकडून पाहणी करून आवश्यक ती कारवाई केली जाणार का?

या अतिक्रमणाला नेमकं अभय कोणाचं? हा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# जिल्ह्यात पावसाने ओढ दिली नदीपात्र कोरडेठण्ण

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर



**अकोला.** जिल्ह्यात यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने त्याचा थेट परिणाम नदी-नाले आणि जलस्रोतांवर दिसून येत आहे. अनेक ठिकाणी नदीपात्र अक्षरशः कोरडे पडले असून, पाण्याऐवजी केवळ ठिकठिकाणी डबकी शिल्लक राहिली आहेत. त्यामुळे शेतीसाठी पाण्याची चिंता वाढली असून, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

अकोला जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्याने दुष्काळी परिस्थितीचे विदारक चित्र समोर आले आहे. यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने नदीपात्रातील पाणीसाठा झपाट्याने कमी झाला असून, अनेक ठिकाणी संपूर्ण नदीपात्र कोरडे पडले आहे. विस्तीर्ण नदीपात्रात आता केवळ ठिकठिकाणी पाण्याची डबकी दिसत आहेत. पिण्याच्या पाण्यासह गुरांच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची चिन्हे आहेत. नदीतील पाणी कमी झाल्याने परिसरातील जलस्रोतांवरही त्याचा परिणाम जाणवत आहे. याचा थेट फटका शेतीला बसण्याची शक्यता असून, आगामी काळात सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार की नाही, याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

# उन्हाचा तडाखा वाढला तापमानाचा पारा 39.9 अंशांवर

## सकाळपासूनच जाणवू लागली उष्णतेची तीव्रता

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर



**अकोला:** शहर आणि परिसरात पुन्हा एकदा उन्हाचा कडाका जाणवू लागला आहे. तापमानात सातत्याने वाढ होत असून शुक्रवारी अकोल्याचा कमाल पारा तब्बल ३९.९ अंश सेल्सिअसवर पोहोचला. त्यामुळे सकाळपासूनच वातावरणात उष्णतेची तीव्रता जाणवत असून दुपारच्या वेळी नागरिकांना अक्षरशः उन्हाच्या झळांचा सामना करावा लागत आहे.

अकोला शहरात सध्या उन्हाचा तडाखा चांगलाच वाढला आहे. तापमानात सातत्याने वाढ होत असल्याने नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम जाणवत आहे. शुक्रवारी अकोल्याचे कमाल तापमान ३९.९ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २३ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले. सकाळपासूनच वातावरणात उष्णता जाणवत असून, दुपारच्या सुमारास उन्हाची तीव्रता आणखी वाढत आहे. त्याचा परिणाम रस्त्यांवरील वर्दळीवरही दिसून येत असून, भर दुपारी नागरिकांची ये-जा तुलनेने कमी होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या तापमानामुळे विशेषतः दुपारच्या वेळी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांना उकाड्याचा मोठा सामना करावा लागत आहे. दरम्यान, शुक्रवारी कमाल तापमान ३७ अंशांच्या पुढे गेले असून, आगामी दिवसांत तापमानात आणखी चढ-उतार होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.त्यामुळे अकोलेकरांनी दुपारच्या कडक उन्हात अनावश्यक बाहेर पडणे टाळण्यासोबतच उष्णतेपासून बचावासाठी आवश्यक ती काळजी घेणे गरजेचे आहे.

# ऑक्टोबर हीटचा तूर-कपाशीला फटका पिकांना पाण्याची गरज वाढली

## पावसाचा खंड, जमिनीतील ओलावा कमी शेतकऱ्यांच्या खर्चात वाढ

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**अकोला:** जिल्ह्यात खरीप हंगामाच्या अखेरच्या टप्प्यात तूर आणि कपाशीसमोर पावसाच्या खंडासोबतच वाढत्या उष्णतेचे आव्हान निर्माण झाले आहे. जमिनीतील ओलावा कमी होत असल्याने पिकांना पाणी देण्याची गरज वाढली आहे. मात्र, स्वतःची सिंचन व्यवस्था नसलेल्या शेतकऱ्यांना पाणी विकत घेऊन पीक वाचवावे लागत असल्याने उत्पादन खर्चातही भर पडत आहे.

अकोला जिल्ह्यात खरीप हंगामाच्या सुरुवातीपासूनच पावसाची अनिश्चितता कायम राहिली. काही भागांत अतिवृष्टीचा फटका बसला, तर काही ठिकाणी पावसाने घेतलेल्या मोठ्या खंडामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम झाला. आता ऑक्टोबरच्या सुरुवातीला वाढलेल्या उष्णतेमुळे शेतातील जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. याचा परिणाम विशेषतः तूर आणि कपाशीच्या पिकांवर जाणवत आहे. सोयाबीनच्या नुकसानीनंतर अनेक शेतकऱ्यांची आशा आता तूर आणि कपाशीच्या उत्पादनावर आहे. मात्र, पिकांना आवश्यक वेळी पाऊस न मिळाल्याने उत्पादनावर परिणाम होण्याची चिंता शेतकऱ्यांना आहे. विशेषतः हलक्या जमिनीतील पिकांना पाण्याची गरज अधिक भासत आहे.दरम्यान, ज्यांच्याकडे



विहीर किंवा कूपनलिकेसारखी स्वतःची सिंचन व्यवस्था नाही, अशा शेतकऱ्यांना पाणी विकत घेऊन पिकांना देण्याची वेळ आली आहे. काही ठिकाणी सिंचनासाठी दररोज सुमारे १ हजार ५०० रुपयांपर्यंत खर्च होत असल्याचे सांगितले जात आहे.आधीच खरीप हंगामातील नुकसानीमुळे आर्थिक गणित बिघडलेले असताना, आता पीक वाचवण्यासाठी करावा लागणारा अतिरिक्त सिंचन खर्च शेतकऱ्यांसाठी नवे आव्हान ठरत आहे.पुढील काळात पावसाने पुन्हा हजेरी लावली नाही, तर तूर आणि कपाशीच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पीक परिस्थितीचा प्रशासनाने आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.पावसाचा खंड, वाढती उष्णता आणि वाढता सिंचन खर्च... खरीप हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात शेतकऱ्यांसमोर आता पीक वाचवण्याचे नवे आव्हान उभे राहिले आहे.

# बोरगाव मंजु येथे रोग निदान शिबीर

**बोरगावं मंजु:** येथे डॉ. एम. एस. गावंडे यांचे स्मृतीदिन प्रित्यर्थ 4 ऑक्टोबर रविवारी सकाळी 9 ते दुपारी 12 वा पर्यंत "डॉ एम एस गावंडे स्मृती दवाखाना सोपीनाथ महाराज मंदिर" येथे मोफत भव्य रोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरात डॉ. राम देवळे छाती दमा रोग व क्षय रोग तज्ञ, डॉ. अंकुश तोष्णीवाल, हृदय व डायबीटिज रोग तज्ञ डॉ. शिवानी तातीया चर्म रोग तज्ञ, डॉ. दुर्गा तोष्णीवाल दंत रोग तज्ञ,डॉ.प्रकाश मेटांगे, डॉ. सुशांत लड्डा अस्थीरोग तज्ञ,डॉ पौर्णिमा ओळंबे न्युरो फिजीओथेरपीस्ट, डॉ. मोरखडे नेत्रतंत्रज्ञ, डॉ. मनोहर घुगे, डॉ. शुभम चऱ्हाटे जनरल फीजीशियन,हे तज्ञ डॉक्टर्स आपली सेवा प्रधान करतील तसेच सत्य साई सेवा संघटना अकोला जिल्हा द्वारे मोफत नेत्र तपासणी करून औषधी वितरण करण्यात येईल.

# अकोला नवीन बसस्थानकात एकीकडे जंतुनाशक फवारणी

## दुसरीकडे मोकाट कुत्र्यांचा वावर

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**अकोला :** नवीन बसस्थानक परिसरात एकीकडे प्रशासनाकडून जंतुनाशक फवारणी करून स्वच्छतेवर भर दिला जात असताना, दुसरीकडे याच परिसरात मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रवाशांसाठी असलेल्या बसण्याच्या जागांवरही कुत्रे ठाण मांडून बसलेले दिसत असल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. बसस्थानकात दररोज मोठ्या संख्येने नागरिक,



महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ प्रवासी ये-जा करतात. अशा परिस्थितीत मोकाट कुत्र्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. कुत्र्यांच्या संपर्कामुळे चावा किंवा इतर माध्यमातून संसर्गाचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे केवळ जंतुनाशक फवारणी न करता मोकाट कुत्र्यांच्या समस्येवरही प्रशासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# आर्थिक मदतीसाठी कागदपत्रे गोळा करताना शेतकऱ्यांच्या नाकी नऊ



## मदती आधीच शेतकऱ्यांच्या खिशाला झळ... रंगीत फोटोसाठी अडवणूक

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**अकोला :** राज्य सरकारकडून राज्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला असला, तरी शेतकऱ्यांच्या हाती मदत मिळण्यापूर्वीच संकटग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड आणि अडचणींचा सामना करावा लागत आहे. खरीप हंगाम पावसाअभावी हातातून गेल्याने आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आता दुष्काळी मदतीच्या पंचनाम्यासाठी आवश्यक कागदपत्रे गोळा करताना पैसे खर्च करावे लागत आहेत. त्यामुळे 'मदत मिळण्याआधीच खर्चाचा भार' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

### रंगीत फोटोसाठी सुद्धा शेतकऱ्यांची अडवणूक

काही गावांमध्ये अधिकाऱ्यांकडून नुकसानीचे 'जिओ टॅगिंग' लोकेशन असलेल्या रंगीत फोटोच्या प्रति या पंचनामा फॉर्मला जोडून देण्याची मागणी केली जात आहे. त्याद्वारे शेतकऱ्यांची एकप्रकारे अडवणूक सुरू आहे. हतबल शेतकऱ्याची फोटो मिळविण्यासाठी भर उन्हातान्हात ससेहोलपट सुरू आहे

### कागदपत्रांसाठी शेतकऱ्यांना करावा लागत आहे खर्च

अकोला जिल्हा व तालुक्यातील अनेक गावांमध्ये सध्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू आहेत. त्यासाठी सात-बारा, आठ-अ उतारा, आधार कार्डची प्रत, फार्मर आयडी, पंचनामा फॉर्म यांसह विविध कागदपत्रांची आवश्यकता असून,ती गोळा करण्यासाठी शेतकऱ्यांची गावोगावी धावपळ सुरू आहे. आवश्यक कागदपत्रे मिळविण्यासाठी 'सीएससी' केंद्रांवर शेतकऱ्यांची मोठी गर्दी होत आहे. अनेक ठिकाणी सर्व्हर डाऊन व तांत्रिक अडचणींमुळे अनेकदा ऑनलाइन प्रक्रिया ठप्प होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तासनतास केंद्रांवर बसून राहावे लागत आहे. दुष्काळामुळे पिके करपल्याने आर्थिक मदतीची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांना आता कागदपत्रांसाठीही प्रतीक्षाच करावी लागत असल्याचे चित्र आहे. दुष्काळामुळे आर्थिक परिस्थिती बिकट असतानाच पंचनाम्याच्या प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे गोळा करण्यासाठी शेतकऱ्यांना खर्च करावा लागत आहे. एका पंचनाम्यासाठी साधारण १५० रुपये खर्च होत आहे आठ-अ, झेरॉक्स, इतर आवश्यक कागदपत्रे मिळविण्यावर शेतकऱ्यांना खर्च करावा लागत आहे. एका पंचनाम्यासाठी साधारणपणे १०० ते १५० रुपये खर्च होत आहे. सात-बारा, आठ-अ, झेरॉक्स, इतर कागदपत्रे आणि ऑनलाइन प्रक्रियेचा मिळून अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. त्यामुळे भरपाईची रक्कम मिळण्यापूर्वीच खिशाला कात्री लागल्याची भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# सिग्नल बंद, वाहतुकीची कोंडी सुरु

## सिंधी कॅम्प, नेहरू पार्कसह प्रमुख चौकांतील सिग्नल कुचकामी

प्रतिनिधी ३ ऑक्टोबर

**अकोला:** शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी उभारण्यात आलेल्या सिग्नल यंत्रणेतील अनेक सिग्नल लाईट बंद असल्याने वाहतुकीचा प्रश्न गंभीर होत आहे. विशेषतः सिंधी कॅम्प चौक आणि नेहरू पार्क चौकातील सिग्नल बंद असल्याने वाहनचालकांना अंदाजाने मार्ग काढावा लागत असून, चौकांमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण होत आहे.

शहरातील प्रमुख चौकांमध्ये दिवसभर वाहनांची मोठी वर्दळ असते. अशा ठिकाणी सिग्नल यंत्रणा कार्यरत नसल्यास कोणत्या दिशेच्या वाहनांना



प्रथम मार्ग द्यायचा, याबाबत वाहनचालकांमध्ये संभ्रम निर्माण होतो. परिणामी वाहतूक कोंडी होण्यासोबतच अपघाताचा धोका वाढण्याची शक्यता आहे.

वाहतूक नियंत्रणासाठी लाखो रुपयांची यंत्रणा उभारली जात असताना ती नियमितपणे कार्यरत ठेवण्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे. सिग्नल लाईट बंद असतील तर त्यांची दुरुस्ती तातडीने का केली जात नाही, तसेच शहरातील किती सिग्नल सध्या पूर्ण क्षमतेने सुरू आहेत, याची माहिती प्रशासनाने स्पष्ट करण्याची गरज आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135